२	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरिकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट, सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines, Bomb Blast, Armed Attacks etc.) यामध्ये तसेच निवडणूक कर्तव्यार्थ असताना कोविड-१९ आजाराने मृत पावलेले अधिकारी / कर्मचारी यांचे वारस	रु. ३०,००,०००/-
३	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी / कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमावणे इ.)	रु. ७,५०,०००/-
४	निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines, Bomb Blast, Armed Attacks etc.) यात कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी / कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमाविणे इ.)	रु. १५,००,०००/-

३. सदर आदेशातील निवडणूक कर्तव्य याचा अर्थ संबंधित अधिकारी / कर्मचारी हे निवडणुकीच्या कर्तव्यासाठी आपल्या घरातून / कार्यालयातून बाहेर पडल्यापासून ते निवडणुकीशी संबंधीत कर्तव्ये पार पाडून आपल्या कार्यालयात / घरी परत येईपर्यंतचा कालावधी असा समजण्यात यावा. निवडणुकीशी संबंधित कर्तव्ये यामध्ये निवडणुकीच्या कामासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा देखील समावेश आहे. तसेच मतदान यंत्र तयारीच्या सर्व प्रकिये दरम्यान नियुक्त केलेले निवडणूक अधिकारी / कर्मचारी /

अभियंते यांना मतदान अधिकारी / कर्मचारी म्हणून समजण्यात यावे. त्यानुसार त्यांना या आदेशातील सानुग्रह अनुदानाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी / कर्मचारी यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, निमशासकीय इतर प्राधिकरण तसेच इतर खाजगी आस्थापना की ज्यातील अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे अधिकारी / कर्मचाऱ्यांसहित केंद्रीय सशस्त्र पोलीस दल CAPF व ECIL कंपनीचे अभियंते, अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश राहील.

४. राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांवरील खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाचा असल्याने असे अनुदानाचे प्रस्ताव प्रकरणपरत्वे संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांनी मंजूर करावेत.

५. सदर आदेश तात्काळ लागू होतील.

(के. सुर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व महानगरपालिका आयुक्त.
३) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा व नगरपंचायती.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

निवडणूक संबंधीत राज्य, जिल्हा व तहसिल स्तरावरील राजपत्रित अधिकाऱ्यांना पारिश्रमिक/ मानधन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : सीईएल-२०२४/प्र.क्र.४५/२४/३३(नि.३) (१),

मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १६.०१.२०२५

शासन निर्णय -

महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ घेण्यात आल्या आहेत. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम घोषित केल्यापासून ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ह्या निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये निवडणूकीच्या कामाशी प्रत्यक्ष संबंधित असलेल्या राज्य, जिल्हा व तहसिल स्तरावरील राजपत्रित अधिकाऱ्यांना ह्या निवडणूकीसंबंधातील समय मर्यादेत संवेदनशील, जिकरीचे दगदगीचे काम अत्यंत परिश्रमपूर्वक व जबाबदारीने पार पाडावे लागले. ह्या निवडणूकीत संबंधित अधिकाऱ्यांवर पडणारा कामाचा ताण, कामाची व्याप्ती व कामाचे दिवस इत्यादी लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या राज्य, जिल्हा व तहसिल स्तरावरील निवडणूकीच्या कामासंबंधीत राजपत्रित अधिकाऱ्यांना त्यांच्या माहे नोव्हेंबर-२०२४ ह्या महिन्यातील अनुज्ञेय मूळ वेतन (Basic Pay) एवढी रक्कम पारिश्रमिक/ मानधन म्हणून देण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे. परंतु कोणत्याही अधिकाऱ्यांची अशी रक्कम त्याच्या १ महिन्याच्या मूळ वेतनापेक्षा जास्त असणार नाही. तसेच सदर मानधन हे एका अधिकाऱ्यास एकदाच देय होईल.

(अ)	**राज्यस्तर :-**
१.	मुख्य सचिव
२.	अपर मुख्य सचिव (गृह)
३.	प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग
४.	मुख्य निवडणूक अधिकारी
५.	सर्व सह सचिव तथा अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी
६	सर्व उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी
७.	राज्य सूचना विज्ञान अधिकारी, महाराष्ट्र राज्य
८.	मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयातील राजपत्रित अधिकारी
९.	मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष निवडणूकीच्या कामाकरिता ज्यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत असे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील राजपत्रित अधिकारी

१०.	मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष निवडणूकीच्या कामाकरिता ज्यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत असे राष्ट्रीय सूचना केंद्रातील (NIC) राजपत्रित अधिकारी
११.	मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयासाठी सामान्य प्रशासन विभागाने अधिग्रहीत करुन ज्यांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत असे राजपत्रित अधिकारी
१२.	निवडणुकीच्या कामासाठी कार्यरत शासन मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई व शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांचे कार्यालयातील राजपत्रित अधिकारी
(ब)	**विभागीय व जिल्हास्तरीय :-**
१.	सर्व विभागीय आयुक्त
२.	सहायक आयुक्त/ उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (फक्त निवडणूकीचे काम करणारे)
३	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
४.	सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
५.	सर्व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
६.	सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (विधानसभा मतदारसंघनिहाय)
७.	सर्व विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
८.	सर्व जिल्ह्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी
९.	सर्व तहसिलदार (फक्त निवडणुकीचे काम करणारे)
१०.	नायब तहसिलदार (प्रत्यक्षात निवडणूक कामकाज केलेले)
११.	जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांचे स्वीय सहायक/ चिटणीस/ हेडक्लार्क (जे राजपत्रित अधिकारी असतील व जे निवडणूकीचे काम पाहणार आहेत)
१२.	या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या प्रत्यक्ष कामासाठी निवडणूकीच्या संपूर्ण कालावधीकरिता स्वत: लेखी आदेश काढून नियुक्त केलेले इतर राजपत्रित अधिकारी
१३.	या व्यतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांनी विधानसभा निवडणूक २०२४ च्या प्रत्यक्ष कामासाठी निवडणूकीच्या संपूर्ण कालावधीकरिता स्वत: लेखी आदेश काढून नियुक्त केलेले इतर राजपत्रित अधिकारी

२. या बाबींवर होणारा खर्च **"मागणी क्रमांक ए-०२, मुख्य लेखाशीर्ष २०१५-निवडणुका, उपशीर्ष १०६-राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च,** (००)(०१) **राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च,** (२०१५ ००६८), **१३-कार्यालयीन खर्च, दत्तमत"** खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल. तसेच नांदेड जिल्हयांतर्गत एकाच वेळी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ आणि १६-नांदेड लोकसभा पोट निवडणूक या निवडणुकांचा खर्च भागविण्यासाठी **"मागणी क्र.ए-२, प्रधानशीर्ष २०१५-निवडणुका** अंतर्गत **"उपशीर्ष १०४-लोकसभा व राज्य/ संघराज्य क्षेत्र विधानसभा यांच्या एकाच वेळेस घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांचा खर्च, (२०१५००४१), १३-कार्यालयीन खर्च"** या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ६६०/व्यय-४, दि.०३.१२.२०२४ व अनौ. संदर्भ क्रमांक २८१/२४/सेवा-६, दि.०९.१२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीनंतर निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०११६१७४८०९७२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YOGESH MAHADEO GOSAVI

Digitally signed by YOGESH MAHADEO GOSAVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=409605c5c875f777d39cbf4ca29ce3d56c5c1d7c1ea54667614a049c47985d83, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D910025DFF598286A45B3B22318E6C113E071B7C6E85F3D06BECDD5995FC1966, cn=YOGESH MAHADEO GOSAVI
Date: 2025.01.16 17:50:28 +05'30'

(योगेश गोसावी)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे
४. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी (सर्व), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर

११. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
१२. जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
१३. सहायक आयुक्त/ उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (निवडणूकीचे काम करणारे)
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी
१७. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
१८. * सर्व जिल्ह्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी
१९. वित्त विभाग सेवा -६ / व्यय-४, मंत्रालय, मुंबई
२०. कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/ का.क्र.२६, मंत्रालय, मुंबई
२१. निवड नस्ती (कार्यासन - ३३)

(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत)

९७२

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांच्या कामासाठी नियुक्त केलेल्या विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवरील अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी केलेल्या जादा कामासाठी अतिकालिक भत्ता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सीईएल-२०२४/प्र.क्र.४५/२४/३३(नि.३) (२),
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६.०१.२०२५

शासन निर्णय -

महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ घेण्यात आली आहे. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केल्यापासून ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ह्या निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणूका संबंधीचे काम ठराविक मुदतीत पार पाडण्यासाठी मंत्रालयीन, विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवरील निवडणूक शाखांमध्ये काम करणाऱ्या वर्गाला सुट्टीच्या दिवसांसह प्रत्येक दिवशी जादा काम करावे लागले. त्याकरिता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्तांची कार्यालये तसेच सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी यांची कार्यालये, तहसिल कार्यालये यामध्ये निवडणूकांचे काम करणाऱ्या, अराजपत्रित कर्मचारी वर्गाला तसेच मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयात व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात, इतर विभागातून/ जिल्हा आस्थापनेतून निवडणूकीच्या कामासाठी घेतलेल्या अतिरिक्त अराजपत्रित कर्मचारी वर्गाला निम्ननिर्देशित शर्तींच्या अधीन राहून, खालील प्रमाणकानुसार अतिकालिक भत्ता देण्यास मंजूर देण्यात येत आहे. :-

१) **अतिकालिक भत्त्याचा दर -**

कोणत्याही कामाच्या दिवशी केलेल्या जादा कामाच्या प्रत्येक पूर्ण तासाला (अर्धा तास किंवा अर्ध्या तासांपेक्षा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल) प्रत्येक तासाच्या मूळ वेतन (Basic Pay) च्या प्रमाणात देण्यात येईल.

टिप - दर ताशी वेतनाचा दर ठरविण्यासाठी महिना ३० दिवसांचा आणि गट "ब" (अराजपत्रित) व गट "क" कर्मचाऱ्यांसाठी दिवस ८.३० तासांचा, वाहनचालकांसाठी दिवस ९.४५ तासांचा समजण्यात येईल. तर चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाचे दैनंदिन कामाचे तास बृहन्मुंबईत ९ तास व इतर ठिकाणी देखील ९ तास समजण्यात येतील.

अटी व शर्ती -

(१) अतिकालिक भत्ता माहे नोव्हेंबर-२०२४ च्या अनुज्ञेय मूळ वेतन (Basic Pay) च्या प्रमाणात तासाच्या दराने दिला जाईल. तसेच दैनंदिन वेतनाचा दर काढताना, त्यामध्ये इतर कुठल्याही भत्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी) समावेश होणार नाही.

(२) सर्वसाधारण कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त काम केलेल्या कामासाठी अतिकालिक भत्ता अनुज्ञेय असेल आणि तो फक्त दिनांक १५.१०.२०२४ पासून ते दिनांक २५.११.२०२४ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीसाठी देय राहील.

(३) उपरोक्त कालावधीतील सुट्टीच्या दिवशी केलेल्या निवडणूकीसंबंधीच्या कोणत्याही कामासाठी अतिकालिक भत्ता दिला जाईल.

(४) मंत्रालय, विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवर निवडणूकीसाठी नेमण्यात आलेल्या शासकीय, निमशासकीय तसेच इतर संस्थांतील कर्मचाऱ्यांना वरील पध्दतीने अतिकालिक भत्ता देय राहील.

(५) अतिकालिक भत्याची कमाल मर्यादा त्यांच्या माहे नोव्हेंबर २०२४ च्या देय होणाऱ्या मूळ वेतना (Basic Pay) एवढी राहील. त्यामध्ये इतर कुठल्याही भत्त्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादि) समावेश होणार नाही. तसेच सदर अतिकालिक भत्ता एका अराजपत्रित कर्मचाऱ्याला एकदाच देय राहील.

(६) जे कर्मचारी निवडणूकीच्या कामासाठी मुख्यालयाबाहेर प्रवास करतील त्यांना नियमानुसार मिळणाऱ्या प्रवास/दैनिक भत्याव्यतिरिक्त अतिकालिक भत्ता देय नाही. या दोन्ही भत्यांपैकी जो फायदेशीर असेल तो भत्ता घेण्याबाबत सदर कर्मचाऱ्यांना पर्याय राहील.

(७) निवडणूकीचे काम ज्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पार पाडले जाते ते अधिकारी, अतिकालिक भत्यासाठी कर्मचारी वर्गाने केलेल्या जादा कामाचा दैनंदिन कालावधी दैनंदिन हजेरीपटाच्या आधारे प्रमाणित करतील.

(८) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून सरकारी व निमसरकारी आणि इतर संस्थांकडून अधिग्रहित करण्यात आलेल्या वाहनांचे वाहनचालकांना अधिग्रहणाच्या कालावधीतील दिनांक १५.१०.२०२४ पासून ते दिनांक २५.११.२०२४ या कालावधीकरिता (दोन्ही दिवस धरून) अटी व शर्तीतील अनुक्रमांक १ व २ नुसार अतिकालिक भत्ता देय राहील.

(९) अधिग्रहित केलेल्या वाहनांच्या चालकांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६, दि.०७.०८.२०२३ नुसार त्यांच्या मूळ विभागातील/संस्थांतील दराने मिळणारा अतिकालिक भत्ता आणि या शासन निर्णयातील निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त कालावधीसाठी अट क्र. १ व २ नुसार मिळणारा अतिकालिक भत्ता यापैकी जो फायदेशीर असेल तो अतिकालिक भत्ता दिनांक १५.१०.२०२४ पासून ते दिनांक २५.११.२०२४ या कालावधीकरिता घेण्याचा पर्याय राहील.

९०४

(१०) निवडणूकीच्या कालावधीत वाहनाचा वापर करणारे प्राधिकारी वाहन चालकांनी केलेले काम वाहनाच्या लॉग बुकवरुन प्रमाणित करतील. सदर प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हा व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी इतर शासकीय विभागाकडून अधिग्रहीत केलेल्या वाहनांच्या वाहनचालकांची अतिकालिक भत्त्याची देयके त्याच्या मूळ विभागाकडे न पाठविता संबंधित वाहन चालकांना निवडणूक निधीतून अदा करावीत.

(११) या शासन निर्णयातील अतिकालिक भत्त्याचा दर व शर्ती खाजगी वाहनांच्या वाहनचालकांना व रोजंदारीवर कार्यरत असलेल्या वाहनचालकांना लागू राहणार नाहीत.

(१२) निवडणूकीच्या कामासाठी दैनंदिन/कंत्राटी तत्वावर नेमलेल्या कर्मचारी वर्गाला अतिकालिक भत्ता देय नाही.

२. या बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक ए-०२, मुख्य लेखाशीर्ष २०१५-निवडणुका, उपशीर्ष १०६-राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (००)(०१) राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (२०१५ ००६८), १३-कार्यालयीन खर्च, दत्तमत" खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल. तसेच नांदेड जिल्हयांतर्गत एकाच वेळी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ आणि १६-नांदेड लोकसभा पोट निवडणूक या निवडणुकांचा खर्च भागविण्यासाठी "मागणी क्र.ए-२, प्रधानशीर्ष २०१५-निवडणुका अंतर्गत "उपशीर्ष १०४-लोकसभा व राज्य/ संघराज्य क्षेत्र विधानसभा यांच्या एकाच वेळेस घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांचा खर्च, (२०१५००४१), १३-कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ६६०/व्यय-४, दि.०३.१२.२०२४ व अनौ. संदर्भ क्रमांक २८१/२४/सेवा-६, दि.०९.१२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीनंतर निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०११६१७५२३४९१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YOGESH MAHADEO GOSAVI

Digitally signed by YOGESH MAHADEO GOSAVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=409605c5c875f727d39cbf4ca29ce3d56c5c1d7c1ea54667614a049c47985d83, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D910025DFF598286A45B3B2231BE6C113E071B7C6E8SF3D06BECDD5995FC1966, cn=YOGESH MAHADEO GOSAVI
Date: 2025.01.16 17:54:11 +05'30'

(योगेश गोसावी)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे
४. सर्व विभागीय आयुक्त

५. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
६. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
७. जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
८. सहायक आयुक्त/ उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (निवडणूकीचे काम करणारे)
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी
१२. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
१३. * सर्व जिल्ह्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी
१४. वित्त विभाग सेवा -६ / व्यय-४, मंत्रालय, मुंबई
१५. कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/ का.क्र.२६, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती (कार्यासन - ३३)

(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत)

९०६

<u>विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४</u>
निवडणुकी कामासाठी नियुक्त केलेल्या सहायक खर्च निरिक्षक / क्षेत्रिय अधिकारी / क्षेत्रिय पोलिस अधिकारी यांना मानधन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सीईएल-२०२४/प्र.क्र.४५/२४/३३(नि.३) (३),
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १६.०१.२०२५

प्रस्तावाना :-

भारत निवडणूक आयोगाने त्यांचे पत्र क्र.४६४/INST/EPS/२०२३/Honorarium, दि.०६.०६.२०२३ च्या पत्रान्वये भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितीतील निवडणुकांच्या कर्तव्यार्थ नियुक्त सहायक खर्च निरिक्षक/क्षेत्रिय अधिकारी/क्षेत्रिय पोलिस अधिकारी यांना मानधन देण्याबाबत सूचना दिल्या आहेत. निवडणूका आयोजित करताना सहायक खर्च निरिक्षक/क्षेत्रिय अधिकारी/क्षेत्रिय पोलिस अधिकारी इत्यादींनी केलेल्या कामाचे स्वरूप आणि कालावधी लक्षात घेता, आयोगाने निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना मानधन देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता नियुक्त केलेल्या सहायक खर्च निरिक्षक/क्षेत्रिय अधिकारी/क्षेत्रिय पोलिस अधिकारी यांना मानधन देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय -</u>

महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ घेण्यात आली आहे. दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केल्यापासून ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ह्या निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये निवडणूकीच्या कामाशी प्रत्यक्ष संबंधित असलेल्या सहायक खर्च निरिक्षक/क्षेत्रिय अधिकारी/क्षेत्रिय पोलिस अधिकारी यांना पूर्णवेळ निवडणूक कामाकरिता किंवा कर्तव्याच्या कालावधीच्या प्रमाणानुसार खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार मानधन म्हणून देण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे :-

लाभार्थ्यांची श्रेणी	दर
सहायक खर्च निरिक्षक/क्षेत्रिय अधिकारी /क्षेत्रिय पोलिस अधिकारी	पूर्णवेळ निवडणूक कामाकरिता रू.७,५००/- किंवा कर्तव्याच्या कालावधीच्या प्रमाणानुसार

२. या बाबींवर होणारा खर्च **"मागणी क्रमांक ए-०२, मुख्य लेखाशीर्ष २०१५-निवडणुका, उपशीर्ष १०६-राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च**, (००)(०१) **राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च**, (२०१५ ००६८), १३-**कार्यालयीन खर्च, दत्तमत"** खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल. तसेच नांदेड जिल्हयांतर्गत एकाच वेळी होणाऱ्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ आणि १६-नांदेड लोकसभा पोट निवडणूक या निवडणुकांचा खर्च भागविण्यासाठी **"मागणी क्र.ए-२, प्रधानशीर्ष २०१५-निवडणुका** अंतर्गत **"उपशीर्ष १०४-लोकसभा व राज्य/ संघराज्य क्षेत्र विधानसभा यांच्या एकाच वेळेस घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांचा खर्च, (२०१५००४१), १३-कार्यालयीन खर्च"** खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ६६०/व्यय-४, दि.०३.१२.२०२४ व अनौ. संदर्भ क्रमांक २८१/२४/सेवा-६, दि.०९.१२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीनंतर निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०११६१७५५३२९२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YOGESH MAHADEO GOSAVI

Digitally signed by YOGESH MAHADEO GOSAVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=409605c5c875f777d39cbf4ca29ce3d56c5c1d7c1ea54667614a049c47985d83, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D910025DFF598286A45B3B22318E6C113E071B7C6E85F3D068ECDD5995FC1966, cn=YOGESH MAHADEO GOSAVI
Date: 2025.01.16 17:56:37 +05'30'

(योगेश गोसावी)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे
४. सर्व विभागीय आयुक्त
५. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
६. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
७. जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर

९०८

८. सहायक आयुक्त/ उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (निवडणूकीचे काम करणारे)
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी
१३. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
१४. * सर्व जिल्ह्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी
१५. वित्त विभाग सेवा -६ / व्यय-४, मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/ का.क्र.२६, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती (कार्यासन - ३३)

(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत)

१०९

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या छपाई/खरेदीसंदर्भात अवलंब करावयाच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शक सूचना...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ-२०२५/सा.ख.छ./प्र.क्र.६/का-१४
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
ई-मेल: sec-material@mah.gov.in
दिनांक:- २१ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :- १) मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य, क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/२४/ निवडणूक-१२,यांचे दि.२७ मे, २०२५ रोजीचे पत्र. (प्रत संलग्न)
२) आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५, दि.२६ जून, २०२५ रोजीचे आदेश. (प्रत संलग्न)
३) उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग- III/उद्योग-४, दि.०१ डिसेंबर, २०१६

प्रस्तावना:-

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या व सुमारे १७०० ग्रामपंचायती या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच २९ महानगरपालिका, २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका (ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसह) आगामी काळात होणार आहेत.

सदर निवडणुकांसाठी साहित्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासणार आहे. सदर साहित्याचे परिमाण निश्चित करणे, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविणे, उपलब्ध साहित्याचे वितरण करणे, मागील निवडणुकीतील शिल्लक सहित्य उपयोगात आणणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे.

यासोबतच छपाई/खरेदी केलेल्या साहित्याच्या साठवणुकीकरिता जागेची अनुपलब्धता, साहित्याचे वितरण प्रक्रियेकरिता नियुक्त जिल्हा स्तरावरील कर्मचारीवृंदाच्या सेवा, त्यांचा प्रवास खर्च, साहित्य नियोजित ठिकाणी पोहोचविण्याकरिता होणारा वाहतूक खर्च, त्याकरिता लागणारा वेळ व श्रम कमी करून सदर प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक असल्याची बाब तसेच निवडणुकांकरिता अनावश्यक खर्च होऊ नये, याची दक्षता घेण्यासाठी सविस्तर सूचना देणे आवश्यक असल्याची बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आली आहे.

तद्वतच राज्यात मोठ्या प्रमाणावर झालेले नागरीकरण, स्थानिक स्तरावर निवडणूक साहित्याची होत असलेली उपलब्धता व प्रशासकीय सुधारणेचा भाग म्हणून या प्रक्रियेच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. यापुढे राज्य निवडणूक आयोग खरेदी करीत असलेले तसेच सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक (सिलींग साहित्य) व अनुषंगिक साहित्य वगळता उर्वरित साहित्य स्थानिक स्तरावर म्हणजेच जिल्हा, यथास्थिती महानगरपालिका व तालुका पातळीवर खरेदी केल्यास वेळ, श्रम व खर्चात बचत होऊ शकते. सदरची बाब विचारात घेऊन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका व पोटनिवडणुकांची प्रक्रिया राबविताना मतदान साहित्याची छपाई/ खरेदी व व्यवस्थापनासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुधारित कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे:-

परिपत्रक

१) **निवडणुकीकरिता आवश्यक साहित्याची यादी:-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांची पूर्वतयारी करण्याकरिता, तसेच मतदान केंद्रांकरिता लागणाऱ्या मतदान साहित्याची यादी राज्य निवडणूक आयोगाकडील विविध पत्राऱ्वये तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या हस्तपुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आली आहे. या साहित्याची यादी सोबतच्या "अ" व "ब" प्रपत्रात नमूद करण्यात आली आहे. या यादीपैकी **प्रपत्र "अ"** मध्ये नमूद साहित्य राज्य निवडणूक आयोगामार्फत खरेदी किंवा छपाई करून संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच **प्रपत्र "ब"** मध्ये नमूद साहित्याची विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून खरेदी/ छपाई करून घेणे हे संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्तांमार्फत उपलब्ध करून घेण्यात यावी.

२) **निवडणूक साहित्याचे प्रमाण निश्चित करणे:-**

सदरच्या यादीमध्ये नमूद साहित्याचे प्रती मतदान केंद्र प्रमाण निश्चित करून देण्यात आले आहे. त्यानुसार त्या-त्या जिल्ह्यांनी, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता निश्चित करण्यात आलेले मतदान केंद्र विचारात घेण्यात यावे. प्रत्येक मतदान केंद्रासाठी नेमून दिलेल्या संख्येनुसार त्या वस्तुचे गुणाकार करून त्यात अधिक १० टक्के वाढ करण्यात यावी. यासोबतच जिल्हा पातळीवर व तहसिल पातळीवर या यादीपैकी व इतर आवश्यक साहित्याची गरज विचारात घेऊन त्या जिल्ह्यासाठी नेमके साहित्य त्याच्या परिमाणासह निश्चित करता येईल. हे साहित्य खरेदी करताना मागील

निवडणुकीमध्ये खरेदी करण्यात आलेले किंवा उपलब्ध असलेले वापरण्यायोग्य साहित्य शिल्लक असल्यास, त्याचा देखील विचार करण्यात यावा.

३. **निवडणूक साहित्य उपलब्ध करून घेणे:-**

निवडणुकांकरिता लागणारे साहित्य उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीच्या नियमपुस्तिकेसंदर्भात निर्गमित शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती वापरुन खरेदी करण्यात यावे.

अ) **जिल्हाधिकारी:-** जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक ते प्रमाण निश्चित झाल्यानंतर लागणाऱ्या साहित्याची खरेदी करणे किंवा छपाई करण्याची प्रक्रिया वर नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करून करण्यात यावी. सदर साहित्याबाबत संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४ यांच्याकडे तसेच आपल्या जिल्ह्याच्या जवळ असलेल्या शासकीय मुद्रणालयामधून प्राधान्याने छपाई करून घेता येईल. तसेच शासकीय मुद्रणालयामधून सदरची छपाई करणे शक्य नसल्यास तसे प्रमाणपत्र शासकीय मुद्रणालयाकडून घेऊन, स्थानिक पातळीवरूनही करता येईल.

ब) **महानगरपालिका आयुक्त:-** महानगरपालिका निवडणुकीसाठी आवश्यक ते प्रमाण निश्चित झाल्यानंतर लागणाऱ्या साहित्याची खरेदी करणे किंवा छपाई करण्याची प्रक्रिया प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करून ज्या महानगरपालिकांची स्वत:ची प्रिंटींग प्रेस असल्यास, निवडणुकीचे छपाईचे साहित्य त्यांच्या स्वत:च्या प्रेसमधून छपाई करून घेता येईल. सदरची सोय उपलब्ध नसल्यास, स्थानिक पातळीवरूनही करता येईल.

४) **निधीची उपलब्धता:-**

अ) **राज्य निवडणूक आयोग:-** राज्य निवडणूक आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या साहित्याची खरेदी अथवा छपाई यावरील खर्च हा त्या-त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आयोगास उपलब्ध करून दिलेल्या अंशदानाच्या निधीतून करण्यात येतो. तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च ग्राम विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीतून भागविला जातो. राज्य निवडणूक आयोगाकडून उपलब्ध करून

देण्यात येणाऱ्या साहित्यामध्ये प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) व त्यांच्याशी निगडित बाबी जसे की, पॉवर पॅक (बॅटरी), मेमरी (DMM), पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग इ. सिलींग साहित्य तसेच मार्कर पेन, मेटल सील इत्यादी (प्रपत्र-अ) मध्ये नमूद केलेल्या साहित्याचा समावेश होतो.

ब) **जिल्हाधिकारी:-** संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च ग्राम विकास विभागामार्फत उपलब्ध करून दिलेल्या निधीतून भागविणे आवश्यक असते. हा खर्च करताना ग्राम विकास विभागाने ठरवून दिलेले निकष व कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करणे आवश्यक असेल.

जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्यावरील खर्च त्या-त्या नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्याकडील उपलब्ध तरतूदीमधून किंवा आवश्यकतेप्रमाणे नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या निधीतून भागविण्यात यावा.

क) **महानगरपालिका आयुक्त:-** राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी लागणाऱ्या साहित्याचा खर्च त्या-त्या महानगरपालिकेकडील निधीतून भागविण्यात यावा.

५. **लोकसभा/ विधानसभा निवडणूक- २०२४ साठी निश्चित केलेले दर संदर्भासाठी वापरणेबाबत:-**

सन २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या वेळेस मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी विहीत प्रक्रियेचा अवलंब करुन काही साहीत्याचे दर निश्चित करुन ते क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/२४/निवडणूक-१२, दि.२७ मे, २०२५ अन्वये सर्व संबंधितांना कळविले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्रात नमूद दर व विहित प्रक्रियेचा अवलंब करून आपणांस प्राप्त झालेले दर याची तुलना करण्याकरिता वापरता येईल, जेणेकरून सदर साहित्य किफायतशीर दराने, योग्य प्रतीचे व वापरण्यायोग्य असे उपलब्ध होऊ शकेल. तथापि, येथे असेही स्पष्ट करण्यात येते की, सदर पत्रामध्ये नमूद असलेल्या पुरवठादारांकडून खरेदी करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून कोणताही आग्रह नाही.

६. **इतर मार्गदर्शक सूचना:-**

i. निवडणूक विषयक साहित्याची खरेदी करतांना, जिल्हाधिकारी, महानगरपालिका व नगरपरिषदा/ नगरपंचायत यांच्या कार्यालयांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या उपरोक्त

खरेदी नियम पुस्तिकेनुसार विहीत केलेल्या खरेदी पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदी प्रक्रिया राबवावी.

ii. मतदान प्रक्रियेतील शिल्लक साहित्याचा विनियोग प्राथम्याने नजिकच्या कालावधीतील सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी करण्यात यावा. तथापि, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राशी संबंधित साहित्य व दीर्घ कालावधीसाठी अभिरक्षित करावयाच्या साहित्याव्यतिरिक्त ज्या साहित्याचा विनियोग नियोजित निवडणुकांकरिता करता येणे शक्य नाही, तसेच जे साहित्य दैनंदीन कार्यालयीन कामकाजाकरिता उपयोगात आणणे शक्य आहे, असे साहित्य (प्रपत्र-ब) जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांचे स्तरावरुन त्यांचे अधिनस्त शासकीय कार्यालयांना कार्यालयीन वापराकरिता उपलब्ध करून द्यावे.

iii. सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी वापरण्यात येणारे नमुने (Forms for actual voting day) व प्रकाशन नमुने (Publication form) वगळता इतर मतदान कामकाज प्रक्रियेशी संबंधित विविध नमुन्याच्या संगणकीय प्रती (Soft Copy) तयार करुन आवश्यकतेनुसार ती संबंधितांना त्या-त्या वेळी भरण्यास उपलब्ध करुन द्याव्यात.

iv. सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती यांनी राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्यादृष्टीने निवडणूक कामकाजासंबंधित प्रकाशन करण्यात आलेल्या विविध माहिती पुस्तिका, निर्देश पुस्तिका, तपासणी सूची व नियम पुस्तिकांच्या पीडीएफ (PDF) प्रती अथवा त्यांचे दुवे (Link) आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात यावेत व शक्यतो डिजिटल स्वरुपातील पुस्तकांचा वापर करण्यात यावा.

v. पुस्तक छपाई आवश्यकच असल्यास, त्या पुस्तकांच्या बाबतीत सर्व संबंधित कार्यालयांनी निवडणूक कामकाजासंबंधित प्रकाशित करण्यात आलेल्या विविध माहिती पुस्तिका, निर्देश पुस्तिका, तपासणी सूची व नियम पुस्तिका यांची आवश्यक मागणी व त्यामधून शिल्लक साठा वजा करुन उर्वरित पुस्तकांची स्थानिक शासकीय मुद्रणालयांकडून अथवा महानगरपालिका मुद्रणालयाकडून छपाई करुन घ्यावी. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास अडचण असल्यास,

स्थानिक मुद्रणालयाकडून पुस्तकांचे मुद्रण करुन घेण्यास हरकत नाही. तथापि, छपाई करतांना छपाईकरिता येणारा खर्च हा पुस्तकाच्या छायाप्रतीसाठी येणाऱ्या खर्चापेक्षा कमी असला पाहिजे. पुस्तकाच्या छपाईवरील खर्च त्यांच्या छायांकित प्रती काढण्यापेक्षा अधिक होत असल्यास, पुस्तकांची छपाई न करता त्यांच्या छायांकित प्रती काढण्यात याव्यात.

७. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या छपाई/खरेदीसंदर्भातील कार्यपद्धतीबाबत व शासकीय काटकसरीचे धोरण अवलंबून शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा योग्य वापर करण्याच्या अनुषंगाने सदरच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२७.०८.२०१५

(सुरेश कांकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. सर्व नगरपरिषदा/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६. निवड नस्ती.

प्रपत्र-अ

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाकडून पुरविण्यात येणाऱ्या मतदान साहित्याची माहिती

अ.क्र.	साहित्याचा तपशील	प्रति मतदान केंद्र संख्या
१	२	३
१	कंट्रोल युनिट मेमरीसह	१
२	बॅलेट युनिट्स (उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून)	२
३	**पॉवर पॅक (कंट्रोल युनिटच्या संख्येनुसार)** (१) नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सध्याच्या निवडणुकांकरिता आयोगाकडून पुरवठा केला जाईल. (२) मात्र अतिरिक्त पॉवर पॅक उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी मे. ईसीआयएल, हैदराबाद या कंपनीकडून आवश्यकतेनुसार खरेदी करता येईल.	१
४	**मार्कर पेन** (१) नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सध्याच्या निवडणुकांकरिता आयोगाकडून पुरवठा केला जाईल. (२) मात्र अतिरिक्त मार्कर पेन उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी मे. कोरस (इंडिया) लि. मुंबई या कंपनीकडून आवश्यकतेनुसार खरेदी करता येईल.	२
५	मतदान केंद्राध्यक्षासाठी धातुची मोहोर (मेटल सील)	१
६	स्पेशल टॅग	३
७	पेपर सील	३
८	पट्टी सील	३

पृष्ठ ७/९

प्रपत्र-ब

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणुका सन २०२५

मतदान केंद्रावर लागणारे निवडणूक साहित्य जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी स्थानिक पातळीवर छपाई/ खरेदी करणे.

अ.क्र.	साहित्याचा तपशील	प्रति मतदान केंद्र संख्या
१	२	३
	(i) छपाई करुन घेण्यात येणारे साहित्य	
१	मतदारांची नोंदवही (नमुना व्हीएम-१)	१
२	मतदार स्लीप (मतदारांच्या संख्येवर अवलंबून)	८०० ते १०००
३	मतदार यादीच्या कार्यप्रती	३
४	मतपत्रिका (प्रदत्त मतांसाठी)	२०
५	मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी	१
६	निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी	१
७	आक्षेपित मतांची यादी	२
८	अंध व अपंग मतदारांची यादी (नमुना व्हीएम-५)	२
९	प्रदत्त मतांची यादी (नमुना व्हीएम-२)	२
१०	नोंद झालेल्या मतांचा हिशोब (नमुना व्हीएम-३-भाग-१)	१०
११	वापरण्यात आलेल्या कागदी मोहोरांचा अभिलेख	२
१२	आक्षेपित मतांची फी जमा करण्यासाठी पावती पुस्तक	१
१३	पोलिस ठाणे अंमलदाराला पत्र	४
१४	मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणारी घोषणापत्रे मतदान सुरू होण्यापूर्वी, मतदान संपल्यावर, दुसरे मतदान यंत्र सील करताना	२
१५	मतदारांना त्यांच्या वयाविषयी घोषणापत्र करण्यासाठी फॉर्म	२
१६	घोषणापत्र दिल्यानंतर मतदान करण्यासाठी दिलेल्या/ वयाविषयी घोषणापत्र देण्यास नकार दिलेल्या मतदारंची यादी	२
१७	अंध व विकलांग मतदारांच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र	४
१८	मतदान प्रतिनिधींसाठी पासेस	१०
	(ii) छपाई करुन घेण्यात येणारे लिफाफे	
१	लहान लिफाफ्यांकरीता (सांविधिक लिफाफे) (एस.ई.८)	१
२	मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी (एसई-८)	१
३	मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी (एसई-८)	१
४	प्रदत्त मतदानपत्रिका व प्रदत्त मतदाराच्या यादीसाठी	१
५	मतदान सुरु होण्यापूर्वी व मतदान संपल्यावर मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणाऱ्या घोषणापत्र करिता (एसई-७)	१
६	नोंद केलेल्या मतांच्या हिशोबासाठी (नमुना व्हीएम-३) (एसई-५)	२
७	आक्षेपित मतांच्या यादीसाठी (एसई-७)	१
८	न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरांसाठी (एसई-५)	१
९	मतदान प्रतिनिधींच्या नेमणूक पत्रांसाठी (एसई-६)	१
१०	अंध व विकलांग मतदारांच्या यादीसाठी (एसई-५)	१
११	मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीच्या अहवालाकरीता (एसई-६)	१
१२	निवडणूक कार्य प्रमाणपत्राकरीता (एसई-५)	१
१३	पावती पुस्तके व समपहरण केलेल्या रकमेसाठी (एसई-६)	१

अ.क्र.	साहित्याचा तपशील	प्रति मतदान केंद्र संख्या
१	२	३
१४	सहकाऱ्याच्या घोषणापत्रासाठी (एसई-५)	१
१५	लहान लिफाफे (इतर) (एसई-७)	१
१६	मतदारांची स्वाक्षरी असलेल्या मतदारांच्या नोंदवहीकरीता (नमुना व्हीएम-१) (एसई)	१
१७	इतर संबंधित कागदपत्रासाठी (एसई-५)	१
१८	लहान लिफाफे (एसई-८)	१
१९	केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीकरीता लिफाफा (एसई-५)	१
२०	कोरे लिफाफे (एसई-५)-२	२
२१	कोरे लिफाफे (एसई-८)-३	३
२२	न वापरलेल्या मतपत्रिकांसाठी (एसई-७)	१
२३	निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, मोहोरबंद असलेल्या लिफाफयामध्ये अन्य कोणतेही पेपर ठेवण्याचे ठरविले आहे, त्यासाठी	१
२४	न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष टॅगसाठी लिफाफा (एसई-७)	१
२५	न वापरलेल्या/खराब पट्टीसीलसाठी (स्ट्रीप सील) लिफाफा (एसई-७)	१
२६	मतदार स्लीप्स ठेवण्याकरीता (एसई-७)	१
	(iii) खरेदी करण्यात येणारे साहित्य	
१	बाणफुली चिन्ह असलेला रबरी शिक्का	१
२	शाई असलेले पॅड (जांभळी)	१
३	आगपेटी	१
४	विभेदक चिन्ह असलेला रबरी शिक्का	१
५	साधी पेन्सिल -१	१
६	बॉलपेन निळे -३	३
७	बॉलपेन लाल - १	१
८	कोरे कागद ८ मोठे तुकडे (शिट्स)	८
९	टाचण्या (पीन्स्) २५ नग	२५
१०	लाख - ६ कांडया	६
११	मतदान कक्षासाठी साहित्य - २+२=४	४
१२	डिंक (गम पेस्ट)१ बाटली	१
१३	ब्लेड-१	१
१४	मेणबत्या -४	४
१५	धातूची पट्टी-१	१
१६	जाड दोरा (Thin twine Thread) २० मीटर	१
१७	कार्बन पेपर-३	३
१८	पॅकेजिंग कागद- २ शीट	२
१९	तेल इत्यादी पुसण्यासाठी कापड किंवा चिंधी- ३	३
२०	ड्रॉईंग पिन - २४ नग	२४
२१	पडताळणी सूची- २	२
२२	रबर बॅन्डस-२०	२०
२३	सेलोटेप-१	१
२४	मतदान साहित्य ठेवण्यासाठी पिशवी	१

सं. क्र. ५४/प्र.क्र.-१४
३०/०५/२०२५

८८

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

निवडणूक प्राथम्य/कालमर्यादा

क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/२४/निवडणूक-१२
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०२५

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,

विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय स्तरावरुन तसेच मुख्य संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई यांचेमार्फत राबविण्यात आलेल्या खरेदीप्रक्रियेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक ०३.०२.२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकांच्या कामकाजा दरम्यान विविध मतदान साहित्याकरिता खरेदीप्रक्रिया राबवितांना आलेल्या अनुभवास अनुसरुन, आगामी लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व पोटनिवडणूकीच्या कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याच्या खरेदीसंदर्भात अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीबाबत सूचना संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भाधीन परिपत्रकानुसार, यापुढे निवडणूक साहित्यप्रक्रिया क्षेत्रिय स्तरावरुन राबविण्याचे निदेश आहेत. सबब, या कार्यालयाकडून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता करण्यात आलेल्या निवडणूक साहित्य खरेदीबाबतची सविस्तर माहिती (उदा. पुरवठादाराचे नांव/ संपर्क क्रमांक / साहित्याकरिता प्राप्त निम्नतम दर इत्यादी) भविष्यातील निवडणूकांदरम्यान खरेदीप्रक्रिया राबवितांना मार्गदर्शक ठरुन, निवडणूकीचे संचलन करण्यास उपयुक्त ठरेल. करिता सदर माहिती संलग्न करुन यासोबत पाठविण्यात येत आहे.

तथापि, पुरवठादारांची नांवे फक्त माहितीस्तव कळविण्यात येत आहेत. खरेदी प्रक्रिया राबवितांना खरेदीची विहीत प्रक्रिया राबविणे अभिप्रेत असून, या पत्रासोबत देण्यात आलेल्या यादीतील पुरवठादारांना प्राधान्य देणे अभिप्रेत नाही, ही बाब विवक्षित निदर्शनास आणण्यात येत आहे.

आपला,

(विक्रम निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे.

प्रत :
१.सर्व उपजिल्हाधिकारी व उप जिल्हा निवडणूक अधिकारी
२:संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई
३.व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई
४.निवडनस्ती.

९२०

<u>विवरणपत्र -१</u>

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ करिता मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत तसेच संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई यांचे कार्यालयाकडून विहीत निविदा प्रक्रिये द्वारे खरेदी करण्यात आलेले साहित्य व प्राप्त निम्नतम दर.

अ.क्र.	साहित्याचे नांव	प्राप्त निम्नतम दर (GST सह)
१.	लाकडी हँडलसह धातूचा शिक्का (Brass Metal Seal)	रु.३४.८१ प्रती नग
२.	अभिरुप मतदान चिठ्ठी शिक्का (Mock Poll Slip Stamp)	रु.१६.०५ प्रती नग
३.	स्पेशल टॅग (Special Tags)	रु.०.७५ प्रती नग
४.	बॅकपॅक (Backpack) CU VVPAT	 रु.२२८०/- प्रती नग रु.२५२०/- प्रती नग
५.	मतदान कक्ष (Voting Compartment) २ BU ३ BU	 रु.१४२/- प्रती नग रु.१७०/- प्रती नग
६.	ब्रेल मतपत्रिका (Brail Voter Slip)	रु.११/- छपाई प्रती नग
७.	धातुची पट्टी (Metal Rule)	रु.१४.८०/- प्रती नग
८.	शाई असलेले पॅड (जांभळे)	रु.१९.६२/- प्रती नग
९.	साधी पेन्सील	रु.२.२८/- प्रती नग
१०.	बॉल पेन निळा, लाल, रुपेरी	 रु.२.७४/- प्रती नग रु.२.७१/- प्रती नग रु.९.९०/- प्रती नग
११.	डिंक (Gum Paste) (६० मि.ली.)	रु.८.९६/-प्रती नग
१२.	टाचण्या (Pins)	रु.१३.५०/- प्रती २५ नग
१३.	पारदर्शक चिकटपट्टी (Transparent Adhesive Tape)	रु.१९.९७/- प्रती नग
१४.	स्पॅज पेटी (Sponges With Box)	रु.६.७५/- प्रती नग
१५.	ब्लेड विथ रेझीन कव्हर	रु.९.८५/- प्रती नग
१६.	थीन ट्राईन थ्रेड	रु.१५.००/- प्रती नग
१७.	कार्बन पेपर	रु.१८५/- प्रती पॅकेट
१८.	ड्रॉईंग पीन (बॉक्स विथ २४ नग)	रु.१३.००/-

१.लाकडी हँडलसह धातूचा शिक्का (Brass Metal Seal) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	रुद्र एंटरप्राईजेस, १८/८८, सरई मानसिंग, अलीगड २०२ ००१, (उत्तरप्रदेश) भ्रमणध्वनी : ९४१००६०४७६.
२.	युनिव्हर्सल ट्रेड लिंक, ११७ ए, ऑफीस क्र.५, तळमजला, जैन गृह उद्योग बिल्डींग, माधवबाग मंदीरजवळ, मुंबई ००४. भ्रमणध्वनी : ७०२१७२७४१३
३.	साईकृष्णा सेल्स, गांधी मार्केट, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९२०९९९५९९९
४.	श्रीकृष्णा एंटरप्राईजेस, ५७, हुडको कॉलनी, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९८९०५८८६६८
५.	इमेज डिजीटल ग्राफीक्स, के ई ६, कबीर मार्ग, बानी पार्क,जयपूर ३०२ ०१६. (राजस्थान) भ्रमणध्वनी : ९६३६२९७३६१
६.	अंबिका स्टेशनरी अँड कंपनी, ३/गोपाल निवास, आझाद रोड, अंधेरी, मुंबई ४०० ०९२.
७.	एकेडीसी गृप आणि कंपनी, ४०२, सीटीएस क्र.६९४ व ६९७, आशानगर, ठाकुर कॉम्लेक्स, कांदिवली, मुंबई ४०० १०१. भ्रमणध्वनी : ७६६६७०६६६९
८.	जय अंजनी एंटरप्राईजेस, शॉप नं.५, हनुमाननगर, चकाला नाका, ए.के.रोड, अंधेरी, मुंबई ४०० ०९३ भ्रमणध्वनी : ९७७३२५००८७
९.	आर के एंटरप्राईजेस, रु.नं.१०, दुसरा मजला, अहमदअली हाऊस क्र.७, मोदी रोड, फोर्ट, मुंबई १. भ्रमणध्वनी : ८८७९७३५७२०
१०.	विनायक एंटरप्राईजेस, त्रिपाठी बिल्डिंग, तळमजला, २४५, बाझारगेट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९९२०९३७२७७
११.	अमर ट्रेडिंग कंपनी, सराई काबा, तुर्कमान गेट, अलिगड २०२ ००१. (उत्तरप्रदेश) भ्रमणध्वनी : ९४१२८२१४८१, ८२१८२८७२८८

२. अभिरुप मतदान चिठ्ठी शिक्का (Mock Poll Slip Stamp):

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	इमेज डिजीटल ग्राफीक्स, के ई ६, कबीर मार्ग, बानी पार्क,जयपूर ३०२ ०१६. (राजस्थान) भ्रमणध्वनी : ९६३६२९७३६१
२.	युनिव्हर्सल ट्रेड लिंक, ११७ ए, ऑफीस क्र.५, तळमजला, जैन गृह उद्योग बिल्डींग, माधवबाग मंदीरजवळ, मुंबई ४. भ्रमणध्वनी : ७०२१७२७४१३
३.	साईकृष्णा सेल्स, गांधी मार्केट, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९२०९९९५९९९
४.	श्रीकृष्णा एंटरप्राईजेस, ५७, हुडको कॉलनी, लातूर ४१३ ५१२. भ्रमणध्वनी : ९८९०५८८६६८
५.	अंबिका स्टेशनरी अँड कंपनी, ३/गोपाल निवास, आझाद रोड, अंधेरी, मुंबई ०९२
६.	एकेडीसी गृप आणि कंपनी, ४०२, सीटीएस क्र.६९४ व ६९७, आशानगर, ठाकुर कॉम्लेक्स, कांदिवली, मुंबई ४०० १०१. भ्रमणध्वनी : ७६६६७०६६६९
७.	जय अंजनी एंटरप्राईजेस, शॉप नं.५, हनुमान नगर, चकाला नाका, ए.के. रोड, अंधेरी मुंबई ४०० ०९३ भ्रमणध्वनी : ९७७३२५००८७
८.	विनायक एंटरप्राईजेस, त्रिपाठी बिल्डिंग, तळमजला, २४५, बाझारगेट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९९२०९३७२७७
९.	आर के एंटरप्राईजेस, रु.नं.१०, दुसरा मजला, अहमदअली हाऊस क्र.७, मोदी रोड, फोर्ट, मुंबई १.भ्रमण ध्वनी : ८८७९७३५७२०

३. स्पेशल टॅग (Special Tags):

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१	प्रमुख नियंत्रक जिल्हा परिषद मुद्रणालय, सांगली, सांगली मिरज रोड, जिल्हा परिषद, कंपाउंड, सांगली मिरज, सांगली - ४१६ ४१६. दुरध्वनी : ०२३३-२३७५४१८.
२	सुधा ऑफसेट प्रिंटर्स ४०४, रणखांबे बिल्डींग, खणभाग, सांगली, सांगली मिरज कुपवाड (महानगरपालिका) मिरज, सांगली - ४१६ ४१६. भ्रमणध्वनी : ८६६८९४३०११
३	शिवानी क्रिएशन्स, डी-६६, अमरवाडी, १ ली खट्टर गल्ली, सी.पी. टँक, मुंबई - ४०० ००४. दुरध्वनी :२३८८१५७२
४	वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला बिल्डिंग, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१. भ्रमणध्वनी : ९८२०८०११५९ दुरध्वनी : २२६९१७७८, २२७००६६३
५	युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन उद्योग गृह इमारत, ११७-ए, सी.पी. टँक रोड, मुंबई - ४०० ००४. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१.

४.बॅकपॅक (Backpack) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	सुकान मार्केटींग, प्लॉट क्र.५९२, फ्लॅट क्र.१२, अनिल व्हीला, २ रा मजला, जेम जमशेज रोड, माटुंग (पूर्व), मुंबई ४०० ०१९. भ्रमणध्वनी : ९९२०३६८१८१, दुरध्वनी : २४१७५६३०
२.	अरिहंत एंटरप्राईजेस, ११ सी, निकडवारी मार्ग, तळ मजला, खोताची वाडी, जैन क्लिनिक मागे, गिरगांव, मुंबई ४०० ००४. भ्रमणध्वनी : ९८२१०२१३९१
३.	मनिष ट्रेडिंग कॉर्पोरेशन, २७६, ताडदेव रोड, ३, मातृमंदिर, चौथा मजला, मुंबई ४०० ००७. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
४.	बीझक्राफ्ट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, ३०६-३१२, ३ रा मजला, ५ युनीट्स बिल्डिंग, EIA, अस्मिता टेक्सटाईल पार्क, एम.आय.डी.सी, भिवंडी, जि.ठाणे. भ्रमणध्वनी ९९८७८७७७१४

५. मतदान कक्ष (Voting Compartment) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	श्री सोमनाथ ऑफसेट, सोमनाथ इंडस्ट्रीअल पार्क, बगोदरा, ता. बावला, जि. अहमदाबाद ३६४००४ (गुजरात) भ्रमणध्वनी : ९८२४२०६५३३
२.	श्याम इंजिनिअरींग, टी ०४, ०५, हार्मनी बिल्डिंग, नरिमन नगर, जयपूर ३०२०१९. (राज्यस्थान) भ्रमणध्वनी : ९५८७२२२६६१

६.ब्रेल मतपत्रिका (Brail Voter Slip) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	Nawph Braille Press, Near SGB Amravati University, Mardi Road, Amravati. Mobile No. 9370182889, 9421742376, 9975311853
२.	The Blind Welfare Organisation, Suyojit Ratan Mall, 3rd floor, Opposite Nehru Garden, Nashik , Mobile No. 9822900717

७. धातुची पट्टी (Metal Rule) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पावंवाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९
२.	मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९
३.	मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
४.	मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३
५.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडदेव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
६.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
७.	मे. जान्हवी इंम्पेक्स, २४३, २ मजला, फाखी मंझील, बाजारगेट मार्ग, फोट, मुंबई ४०० ००१.

८. शाई असलेले पॅड :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. स्टँडर्ड टेक्नोलॉजिस,१८ वा मजला, नॉर्थ वेस्ट ए, सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८. भ्रमणध्वनी : ९८२०९९८०००
२.	मे. महादेव स्टेशनरी, ३१०, डी विंग, कंकैया, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९७६९४३३३६३
३.	मे. महावीर इंडस्ट्रिज,जी-५५, सी-३, महावीर नगर, शंकर मार्ग, कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७. भ्रमणध्वनी : ९८५०९१९९७१.
४.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडदेव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
५.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
६.	मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
७.	मे. युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१
८.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९
९.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५

९. साधी पेन्सील (Ordinary Pencil) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८०
२.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
३.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
४.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
५.	मे. युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१
६.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९

१०. अ.बॉलपेन (Blue) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
२.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
३.	मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८०
४.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
५.	मे. युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१
६.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९

१०. ब.लाल बॉलपेन (Red) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. राशी ट्रेडर्स, जी-५५, सी-३, महावीर नगर, जैन सोसायटी, कांदिवली पश्चिम मुंबई ४०० ०६७ भ्रमणध्वनी : ९९३०६४४५८०
२.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
३.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
४.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
५.	मे. युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१
६.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१. भ्रमणध्वनी ९८२०८०११५९

१०. क.सिल्व्हर बॉलपेन (Silver):

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१
२.	मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
३.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
४.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
५.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
६.	मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९

११. डिंक (Gum Paste)

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९
२.	मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
३.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.
४.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
५.	मे. शिवानी क्रिएशन, डी ६६, २ रा मजला, अमरवाडी, पहिली खत्तरगल्ली, सी.पी.टँक, मुंबई ४०० ००४ भ्रमणध्वनी : ९३२०४७१०८०
६.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
७.	मे. युनिव्हर्सल ट्रेड लिंक, तळमजला, ५ जैन गृह उद्योग इमारत, सी.पी.टँक रोड, मुंबई ४०० ००२. भ्रमणध्वनी : ८०८२३०५१७१
८.	मे. जिगर ट्रेडर्स, १०१, रजवाडी चाळ, जांभळी गल्ली, बोरिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९२. भ्रमणध्वनी : ९३२२२७००४९

१२. टाचण्या (Paper Pins) :

अ.क्र.	पुरवठादाराचे नांव व पत्ता
१.	मे. वसंत ट्रेडर्स, १६१, पाववाला, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१ भ्रमणध्वनी ९८२०८०११५९
२.	मे.कृष्णा एंटरप्राईजेस, फ्लॅट क्र.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
३.	मे. मनिष ट्रेडींग कंपनी, चवथा मजला, मातृमंदिर बिल्डींग, ताडेदव रोड, मुंबई ४०० ००६. भ्रमणध्वनी : ९३२२२४३८४२.

४.	मे. मोगल ट्रेडर्स, फ्लॅट न.२, बिल्डिंग क्र.५, सागबाग, स्नेहानगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९. भ्रमणध्वनी : ९८२०४७१०८०.
५.	मे. शिवानी क्रिएशन, डी ६६, २ रा मजला, अमरवाडी, पहिली खत्तरगल्ली, सी.पी.टँक, मुंबई ४०० ००४ भ्रमणध्वनी : ९३२०४७१०८०
६.	मे. दि लोकल प्रिंट हब, अ-३०९, आनंद नगर, फोरजी स्ट्रीट, ताडदेव, मुंबई ४०० ०३६. भ्रमणध्वनी : ९६६४३३८३९५
3. Submission of an irrevocable Bank Guarantee of the Contract amount in the format **(specify format)** specified to the Client.
4. The following would be the Milestones and Payment

SN	Milestone	Approval	By Date
1.	Inception Report Submission	By RO	(Enter date)
2.	Training Documents and Multimedia content & Training for all officials concerned	By DEO	(Enter date)
3.	Two Trial runs and satisfactory Certificate before two days of poll day and counting day.	By RO	(Enter date)
4.	Submission of all other project deliverables and final report	By DEO and Payment in full	Within 15 days after the completion of polling and counting events

No advance Payment will be made

Service Level Agreement

1. 100% Server, Network & Power Uptime SLA: The vendor should provide with 100% Server, Network & Power Uptime SLA as standard. This shall be applicable

during the election day as declared by the client and shall be applicable for 24 hours or as decided by the client. The vendor should ensure

SERVICE AVAILABILITY	Deduction from total cost
99.9% to 100%	0%
98% to 99.8%	10%
95% to 97.9%	25%
90% and below	50%

2 The buffer should not happen in the streaming at the RO office. Vendor will develop a dashboard for reporting the buffer and failure.

Buffer and connection loss	Deductions from the total cost
<10 point failures	0%
>10 Points Failure	10%
>50 Points Failure	25%
>100 Point Failures	50%

Appendix

Technical Specifications of the camera

During Polling	IP based web camera
	3 MegaPixel minimum
	night vision capability
	wide angle with 30/ 170 degrees coverage
	minimum illumination of .05 lux.
	support 16-4096 Kbps code rate
	support constant bit rate/variable frame rate of up to 30 fps
	Image Control: Backlight compression, Automatic white balance, 3D digital noise reduction.
	display should be supported is 1920 x1080.

महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे इत्यादिबाबत...

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.५/का.५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल : sec.corp@mah.gov.in
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२५

वाचा : राज्य निवडणूक आयोगाचे सम क्रमांकाचे दि. ०६ जुलै, २०२२ रोजीचे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. ०६ जुलै, २०२२ च्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी तीन सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत तसेच इतर बाबींसाठी तरतूद करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने दि. १८ मार्च, २०२४ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात दुरुस्ती करुन बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिकांच्या निवडणुकांकरीता चार सदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. त्यामुळे प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे किती प्रभाग राहतील यासंदर्भातील सुधारीत आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी आता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन

राज्य निवडणूक आयोगाचे उपरोक्त दि. ०६ जुलै, २०२२ चे आदेश रद्द करुन खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता ६ ते ८ प्रभागांकरीता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

२) राज्यातील इतर महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता ३ ते ४ बहुसदस्यीय प्रभागांकरीता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

३) महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महापालिका आयुक्त, उपजिल्हाधिकारी पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही, अशा अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करतील.

४) अपवादात्मक परिस्थितीत सार्वत्रिक निवडणुकीकरीता अन्य महानगरपालिकेमधील उपायुक्त यांना (उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेला) अथवा पोट निवडणुकीसाठी महानगरपालिकेच्या कार्यालयातील उपायुक्त यांना (उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेला), निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर महानगरपालिकेच्या संबंधित अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना, परिपत्रकातील तरतुदीनुसार निवडणुकीचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी राहील.

५) निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नेमतांना विभागीय आयुक्त यांनी राज्य निवडणूक आयोगाने दि. १६ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या आदेशातील निकष पाळणे बंधनकारक राहील. तसेच खालील बाबींची देखील खात्री करण्यात यावी :-

(i) संबंधित अधिकारी उत्कृष्ट, संशयातित सचोटी व नि:पक्षपातीपणे काम करणारे असावेत. त्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर संबंध नाही याबाबतची खात्री करावी.

(ii) सदर अधिकाऱ्यांना योग्य व पुरेसे प्रशिक्षण द्यावे.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, नेमलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक सबबी देऊन रद्द करण्याचे प्रकार वारंवार घडतात व त्यामुळे नेमणुकांना विलंब होतो व निवडणुकांच्या कामात अडचणी निर्माण होतात. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नेमणुका करताना विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या वारंवार करण्यात येतात.

असे प्रकार टाळण्यासाठी संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाने रोस्टर तयार करुन चक्रानुक्रमे नियुक्त्या कराव्यात. जेणेकरुन निवडणुकांमध्ये आळीपाळीने सर्वांच्या नियुक्त्या केल्या जातील.

(iv) एखाद्या अधिकाऱ्याकडील कामकाजाचे स्वरुप अथवा त्याची नियुक्ती रद्द करण्याचे कारण पाहता, त्यावेळी त्या अधिकाऱ्याला निवडणूक कामकाज देणे शक्य नाही अशी विभागीय आयुक्त यांची खात्री झाल्यास, इतर अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल. मात्र त्यानंतर येणाऱ्या पुढील निवडणुकांमध्ये अशा नियुक्ती न केलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती न चुकता होईल याची दक्षता विभागीय आयुक्त यांनी घ्यावी.

(v) जर एखादा अधिकारी निवडणुकीचे कामकाज हेतुपुरस्सर टाळण्याचा प्रयत्न करीत असल्याची विभागीय आयुक्त यांची खात्री झाल्यास, अशा अधिकाऱ्यास निलंबित करुन त्याचा अहवाल त्यांनी राज्य निवडणूक आयोगास तात्काळ सादर करावा.

६) निवडणूककामी महानगरपालिका आयुक्तांना उप जिल्हाधिकारी/उपायुक्त व तहसिलदार संवर्गातील अधिकारी उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील. मात्र त्यांच्या नेमणुकीचे आदेश संबंधित महानगरपालिका आयुक्त काढतील.

७) महानगरपालिका आयुक्त पुढे नमूद केल्याप्रमाणे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करतील. तसेच प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

अ) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १** - हा अधिकारी तहसिलदार संवर्गातील असेल व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार पार पाडावयाच्या कामकाजात मदत करेल.

ब) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २** - हा अधिकारी महानगरपालिकेच्या कार्यालयातील तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अन्य अधिकारी असेल. तो मतदान केंद्राची पाहणी करणे व तेथे योग्य त्या सोयीसुविधा पुरविणे, मतदान व मतमोजणी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे, साहित्य वाटप, इ. बाबत

आवश्यक ती कार्यवाही करेल. आचारसंहितेशी संबंधित कामकाज पार पाडण्यासाठी हा अधिकारी आचारसंहिता कक्षाबरोबर योग्य तो समन्वय साधेल.

क) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३** - हा अधिकारी महानगरपालिकेच्या कार्यालयातील नायब तहसिलदार पदाच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा दर्जाचा अन्य अधिकारी असेल. तो निवडणूक व्यवस्थापनांतर्गत महानगरपालिकेची वेबसाईट अद्ययावत करणे, त्यावर वेळोवेळी उमेदवारांची प्रतिज्ञापत्रे अपलोड करणे, वृत्तपत्रांची कात्रणे व इतर माहिती अपलोड करणे, तसेच राज्य निवडणूक आयोगास विहित नमुन्यामधील माहिती वेळोवेळी सादर करणे, इ. अनुषंगिक कामे करेल.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ व २ हे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कोणतीही कर्तव्ये पार पाडू शकतील. परंतु नामनिर्देशनपत्राची छाननी करणे याच्याशी संबंधित असलेल्या आपल्या कामांपैकी कोणतेही काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी अनिवार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ झाला नसेल तर, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्राची छाननीशी संबंधित कामांपैकी कोणतेही काम पार पाडणार नाही.

८) आचारसंहिता कक्ष - महानगरपालिका आयुक्त निवडणूक आचारसंहितेशी संबंधित सर्व कामकाज हाताळण्यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करतील. तसेच सदर कक्षाचा प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी संवर्गातील एका अधिकाऱ्याची नियुक्ती करतील. आचारसंहितेशी संबंधित सर्व कामकाज या कक्षाकडून हाताळण्यात येईल.

९) उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचा हिशोब - महानगरपालिका आयुक्त निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेल्या निवडणूक खर्चाचा हिशोब तपासण्याकरीता किमान एक व कमाल तीन कक्ष स्थापन करतील व या कक्षामध्ये लेखाधिकारी वर्ग-१ या संवर्गातील एका अधिकाऱ्याची कक्ष प्रमुख म्हणून नियुक्ती करतील. उमेदवारांनी सादर केलेल्या दैनंदिन व एकत्रित खर्चाचे हिशोब या कक्षामार्फत तपासण्यात येतील.

१०) महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी महापालिका आयुक्त यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नेमणूक, सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची नेमणूक तसेच या आदेशात नमूद केल्याप्रमाणे

अन्य कामांसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे ही संबंधित विभागीय आयुक्त यांची जबाबदारी राहील.

११) नियंत्रण - महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त हे "निवडणूक अधिकारी " म्हणून काम पाहतील. सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक तसेच निवडणुकीशी संबंधित इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे निवडणूक अधिकाऱ्यांच्या म्हणजेच महानगरपालिका आयुक्त यांच्या नियंत्रण आणि पर्यवेक्षणाखाली काम करतील.

सदर आदेश राज्य निवडणूक आयोगाच्या www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) ०६.०८.२०२५

सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व महानगरपालिका आयुक्त.
३. सर्व विभागीय आयुक्त.
४. सर्व जिल्हाधिकारी.
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने.
६. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
८. निवड नस्ती.

महानगरपालिका निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियुक्त्या करणे, त्यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविणे इत्यादिबाबत...





राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक - २८ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :-राज्य निवडणूक आयोगाचे सम क्रमांकाचे दि.०६ ऑगस्ट, २०२५ रोजीचे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांकरीता प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे किती प्रभाग राहतील याची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यात विभागवार आढावा बैठका घेतल्या असता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठी राज्यात उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत असे निदर्शनास आले.

आणि ज्याअर्थी उपलब्ध असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या व एकाच वेळी होणाऱ्या सर्व निवडणुका या बाबींचा विचार करता आगामी निवडणुकांकरीता किती प्रभागांकरीता एक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात यावा यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे. :-

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधिन आदेशातील मुद्दा क्र. १ व २ येथे मध्ये नमूद केलेली निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे नेमून द्यावयाची प्रभागांची संख्या खालील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे. :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता १० ते १२ प्रभागांसाठी एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

२) राज्यातील इतर (बृहन्मुंबई व्यतिरिक्त) महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता शक्यतो ३ प्रभागांकरीता व अपवादात्मक परिस्थितीत ४ प्रभागांकरीता एक याप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) २८/०८/२०२५
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
२. सर्व विभागीय आयुक्त.
३. सर्व जिल्हाधिकारी.
४. सर्व महानगरपालिका आयुक्त.
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व निवडणूक कार्यासने.
६. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
८. निवड नस्ती.

लोकसभा / विधानसभेच्या सार्वत्रिक / पोटनिवडणूकीसंबंधी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना पारिश्रमिक / मानधन, अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इ. देणेबाबत - सुधारित दर.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीयुडी-२०२५/प्र.क्र.१४०/२५/का.-३३ (नि.-३),
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४.११.२०२५

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीईएल-२०२४/प्र.क्र.१२७/२४/३३, दि.१८.०४.२०२४.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीईएल-२०२४/प्र.क्र.६२५/२४/३३(३), दि.०१.०७.२०२४.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीईएल-२०२४/प्र.क्र.७०७/२४/३३, दि.१६.०७.२०२४.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. सीईएल-२०२४/प्र.क्र.४५/२४/३३(नि.३)(३), दि.१६.०१.२०२५.
५) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४६४/INST/EPS/२०२५/Remuneration & TA/DA, दि.०८.०८.२०२५.
६) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४६४/INST/EPS/२०२५/Honorarium, दि.०८.०८.२०२५.

प्रस्तावना :-

भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितीत लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक/पोट निवडणूकांच्या कामासाठी नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाचे पारिश्रमिक / मानधन, अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इत्यांदीचे दर शासनाच्या संदर्भाधीन क्र.१ ते ४ येथील शासन निर्णयांन्वये निश्चित केलेले आहेत. भारत निवडणूक आयोगाने त्यांचे संदर्भाधीन क्र.५ व ६ येथील दि.०८.०८.२०२५ रोजीच्या पत्रांन्वये निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाचे पारिश्रमिक / मानधन, अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इ. दरांमध्ये सुधारणा करण्याबाबत निर्देश दिले आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या सदर पत्रातील सूचनांना अनुसरुन भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितीतील राज्यातील आगामी लोकसभा/विधानसभा निवडणुकांच्या कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात येणा-या निवडणूक अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाचे पारिश्रमिक / मानधन, अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इत्यादींच्या अनुषंगाने सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

भारत निवडणूक आयोगाच्या पत्र क्र.४६४/INST/EPS/२०२५/Remuneration & TA/DA, दि.०८.०८.२०२५ व पत्र क्र.४६४/INST/EPS/२०२५/Honorarium, दि.०८.०८.२०२५ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांना अनुसरुन भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारितीतील महाराष्ट्र राज्यातील आगामी लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक/पोट निवडणूकांच्या कामासाठी नियुक्त करण्यात येणारे अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाचे पारिश्रमिक / मानधन, अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इत्यादीबाबत पुढीलप्रमाणे सुधारित दर मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे:-

अ.क्र.	अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम	विद्यमान दर	सुधारित दर
		निवडणूक भत्ता	
१	क्षेत्रिय दंडाधिकारी (क्षेत्रिय अधिकारी व्यतिरिक्त तैनात असल्यास)	रु.१५००/- (एकत्रित एकदा)	**यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे** रु.१५००/- (एकत्रित एकदा)
२	मतदान केंद्राध्यक्ष / मतमोजणी पर्यवेक्षक	**रु.३५०/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता)	**रु.५००/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता किंवा **रु.२०००/-** एकत्रित एकदा)
३	मतदान अधिकारी	**रु.२५०/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता)	**रु.४००/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता किंवा **रु.१६००/-** एकत्रित एकदा)
४	मतमोजणी सहायक	**रु.२५०/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता)	**रु.४५०/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता किंवा **रु.१३५०/-** एकत्रित एकदा)
५	चतुर्थश्रेणी कर्मचारी (ईव्हीएम मशिन्सचे कमिशनिंग, मतदानपथके रवाना करणे, मतदान साहित्य व मतमोजणी इत्यादी कामाकरिता नियुक्त केलेले)	**रु.२००/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता)	**रु.३५०/-** (प्रत्येक दिवसाकरीता किंवा दिवसाच्या भागाकरीता किंवा **रु.१४००/-** एकत्रित एकदा)
६	चतुर्थश्रेणी कर्मचारी (कॉल सेंटर / नियंत्रण कक्ष याकरिता नियुक्त केलेले)		**रु.१०००/-** (एकत्रित एकदा)
७	फिरते व्हिडीओ पथक, व्हिडीओ निरिक्षण पथक, लेखा पथक, नियंत्रण कक्ष व कॉल सेंटर मधील कर्मचारी, प्रसार माध्यमांना प्रमाणपत्र देणारी व देखरेख करणारी यंत्रणा, फिरते पथक, स्थिर देखरेख पथक (Static Surveillance Team), खर्च नियंत्रण सेल	वर्ग-१ / वर्ग-२ रु.**१२००/-** (एकत्रित एकदा) वर्ग-३ **रु.१०००/-** (एकत्रित एकदा)	वर्ग-१ / वर्ग-२ **रु.३०००/-** (एकत्रित एकदा) वर्ग-३ **रु.२०००/-** (एकत्रित एकदा)
८	आयकर निरिक्षक	**रु.१२००/-** (एकत्रित एकदा)	**रु.३०००/-** (एकत्रित एकदा)
९	सूक्ष्म निरिक्षक	**रु.१०००/-** (एकत्रित एकदा)	**रु.२०००/-** (एकत्रित एकदा)
		आहारभत्ता	
१	मतदान केंद्र / मतमोजणी केंद्रावर निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त	भोजनाची पाकिटे किंवा प्रत्येक दिवसाकरीता **रु.१५०/-** किंवा	भोजनाची पाकिटे किंवा प्रत्येक दिवसाकरीता **रु.५००/-** किंवा

अ.क्र.	अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम	विद्यमान दर	सुधारित दर
	अधिकारी / कर्मचारी यांच्यासहीत पोलीस अधिकारी / कर्मचारी, मोबाईल पथके, होमगार्ड, वनरक्षक दल, ग्रामरक्षक दल, एनसीसी कॅडेटस, माजी सैनिक, स्वयंसेवक यांचे करीता भोजनाची पाकिटे किंवा सौम्य आहार	दिवसाच्या भागाकरीता	दिवसाच्या भागाकरीता
		TA/DA	
१	निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी / कर्मचारी	१००% प्रवास भत्ता / दैनिक भत्ता रक्कम (TA/DA) पध्दत-१ : TA/DA च्या १००% रक्कम एकतर निवडणूक कर्तव्य पूर्ण केल्याच्या २४ तासांच्या आत किंवा आगाऊ. पध्दत-२ : TA/DA च्या ८०% रक्कम आगाऊ आणि २०% रक्कम निवडणूक पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत	**यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे** १००% प्रवास भत्ता / दैनिक भत्ता रक्कम (TA/DA) पध्दत-१ : TA/DA च्या १००% रक्कम एकतर निवडणूक कर्तव्य पूर्ण केल्याच्या २४ तासांच्या आत किंवा आगाऊ. पध्दत-२ : TA/DA च्या ८०% रक्कम आगाऊ आणि २०% रक्कम निवडणूक पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत
		मानधन	
१	**सी.ए.पी.एफ. चे राजपत्रित अधिकारी** (कमांडंट [Commandant], तदर्थ कमांडंड [Ad hoc Commandant], उप कमांडंट [Dy. Commandant], सहायक कमांडंट [Assistant Commandant], वैद्यकीय अधिकारी [Medical Officer] व इतर समतुल्य श्रेणीचे अधिकारी)	(१) १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी – **रु.२,५००/-** (२) १५ दिवसापेक्षा अधिक – **रु.१,२५०/-** प्रती आठवडा या दरानुसार	(१) १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी – **रु.४,०००/-** (२) १५ दिवसापेक्षा अधिक – **रु.२,०००/-** प्रती आठवडा या दरानुसार
२	**सी.ए.पी.एफ. चे दुय्यम अधिकारी** (निरीक्षक [Inspector], उप-निरीक्षक [Sub-Inspector], सहायक उप-निरीक्षक [Asst. Sub-Inspector] व इतर समतुल्य श्रेणीचे अधिकारी)	(१) १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी – **रु.२,०००/-** (२) १५ दिवसापेक्षा अधिक – **रु.१,०००/-** प्रती आठवडा या दरानुसार	(१) १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी – **रु.३,०००/-** (२) १५ दिवसापेक्षा अधिक – **रु.१,५००/-** प्रती आठवडा या दरानुसार
३	**सी.ए.पी.एफ. च्या इतर श्रेणी** (हेड कॉन्स्टेबल [Head Constable], कॉन्स्टेबल [Constable] व समतुल्य श्रेणी)	(१) १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी – **रु.१,५००/-** (२) १५ दिवसापेक्षा अधिक – **रु.७५०/-** प्रती आठवडा या दरानुसार	(१) १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी – **रु.२,५००/-** (२) १५ दिवसापेक्षा अधिक – **रु.१,२५०/-** प्रती आठवडा या दरानुसार

अ.क्र.	अधिकारी व कर्मचारी यांचे पदनाम	विद्यमान दर	सुधारित दर
४	सहायक खर्च निरिक्षक / क्षेत्रिय अधिकारी / क्षेत्रिय पोलिस अधिकारी	पूर्णवेळ निवडणूक कामाकरिता **रु.७,५००/-** किंवा कर्तव्याच्या कालावधीच्या प्रमाणानुसार	पूर्णवेळ निवडणूक कामाकरिता **रु.१०,०००/-** किंवा कर्तव्याच्या कालावधीच्या प्रमाणानुसार

२. उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या सुधारित दरांव्यतिरिक्त संदर्भाधीन क्र.१ ते ४ येथील शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या इतर बाबींमध्ये कोणताही बदल करण्यात येत नसून त्या पूर्वीप्रमाणेच राहतील. **"उपरोक्त सुधारित दर हे प्रस्तुत शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होतील."**

३. उपरोक्त बाबींवर होणारा खर्च प्रकरणपरत्वे मागणी क्र.ए-०२, "२०१५-निवडणूका, १०५-संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (००)(०१) संसदेच्या निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (२०१५००५९), १३-कार्यालयीन खर्च" किंवा "२०१५-निवडणूका, १०६-राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (००)(०१) राज्य/संघराज्यक्षेत्र विधानमंडळ निवडणुका घेण्यासाठी लागणारा खर्च, (२०१५००६८), १३-कार्यालयीन खर्च" किंवा "२०१५-निवडणूका, १०४-लोकसभा व राज्य संघराज्य क्षेत्र विधानसभा यांच्या एकाच वेळेस घेतल्या जाणा-या निवडणुकांचा खर्च, (२०१५००४१), १३-कार्यालयीन खर्च" ह्यापैकी लागू असलेल्या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात येणारे अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाचे पारिश्रमिक / मानधन, अतिकालिक भत्ता / निवडणूक भत्ता इत्यादीबाबत निर्गमित करण्यात येणा-या ज्ञापनाची प्रत वित्त विभाग/व्यय-४ यांना चिन्हांकित करण्यात यावी.

५. सदरचा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६२१/व्यय-४, दि.१७.१०.२०२५ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२८२/सेवा-६, दि.११.११.२०२५ अन्वये तसेच प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५११२४१६५५३४०२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YOGESH MAHADEO GOSAVI

Digitally signed by YOGESH MAHADEO GOSAVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=409605c8c875f777d39cbf4ca29ce3d56c5c1d7c1ea54667614a049c47985d83, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D910025DFF598286A45B3B22318E6C113E071B7C6E85F3D06BECDD5995FC1966, cn=YOGESH MAHADEO GOSAVI
Date: 2025.11.24 16:56:54 +05'30'

(योगेश गोसावी)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-२ नागपूर
३. सर्व विभागीय आयुक्त
४. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
५. जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
६. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
७. सहायक आयुक्त/ उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (निवडणूकीचे काम करणारे)
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे

१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी
१२. * सर्व विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
१३. * सर्व जिल्ह्याचे उप जिल्हा निवडणूक अधिकारी
१४. वित्त विभाग सेवा-५/६ व व्यय-४, मंत्रालय, मुंबई
१५. कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/ का.क्र.२६, मंत्रालय, मुंबई
१६. निवडनस्ती (कार्या.-३३/नि.-३)

(* जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेमार्फत)

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.२४ /का-५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक:- १२ डिसेंबर, २०२५.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. १३ ऑगस्ट, २०१८ व दि. १६ मार्च, २०२० चे आदेश.

आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने दि. ०५ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशान्वये महानगरपालिका निवडणुकांकरीता नामनिर्देशपत्राचा व शपथपत्राचा नमुना विहित केला. मात्र त्यानंतर सदर शपथपत्राचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने दि. १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशान्वये सुधारीत केला.

ज्याअर्थी, शासनाने दि. २७ सप्टेंबर, २०१८ रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्र. २०/२०१८ अन्वये जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत सहा महिन्यांऐवजी बारा महिन्यांची केली. व त्यास अनुसरून दि. २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी त्यास अनुसरून योग्य ते बदल उपरोक्त शपथपत्रात करण्यात आले.

ज्याअर्थी, शासनाने जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास दिलेली मुभा संपुष्टात आल्यामुळे जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र बंधनकारक झाले व त्यामुळे दि. १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशान्वये विहित केलेल्या शपथपत्रात दि. २८ नोव्हेंबर, २०१८ अन्वये समाविष्ट केलेले परिच्छेद क्र. ३ (इ), १६.३ (अ) व १६.३ (ब); राज्य निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च, २०२० च्या आदेशान्वये रद्द केले.

ज्याअर्थी, शासनाने सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ११, दि. ०३ नोव्हेंबर, २०२५ अन्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ५ ब व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ ब मध्ये सुधारणा केली असून उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत दिली आहे. त्यामुळे दि. १६ मार्च, २०२० चे आदेश रद्द करुन दि. २८ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशात सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुषंगाने नामनिर्देशनपत्र व शपथपत्रात आवश्यक ठिकाणी संबंधित तरतुदींचा उल्लेख करणे देखील आवश्यक आहे.

त्याअर्थी, उपरोक्त दि. १६ मार्च, २०२० चे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत असून दि. २८ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशान्वये परिच्छेद १६.३ मध्ये करण्यात आलेली सुधारणा रद्द करण्यात येत आहे. दि. १३ ऑगस्ट, २०१८ च्या आदेशातील महानगरपालिका निवडणुकांकरीता अनुसूची- १ मध्ये विहित केलेल्या नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने द्यावयाच्या शपत्रपत्रामध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहेत:-

१. "३(इ) जातवैधता प्रमाणपत्र नसेल तर उमेदवाराने
जात वैधता प्रमाणपत्रासाठी पडताळणी समितीकडे
सादर केलेल्या अर्जाच्या पोचपावतीचा तपशिल :----------"

२. मूळ परिच्छेद क्र. १६.३ ऐवजी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.-

"१६.३(अ) निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि मी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य राहण्यास अनर्ह/अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

१६.३(ब) निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करीन अशी हमी देत आहे."

३. दि. ०५ ऑक्टोबर, २०१५ च्या आदेशान्वये विहित केलेल्या नामनिर्देशपत्रातील मुद्दा क्र.११ नंतर उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र यामधील मुद्दा क्र. (ब) खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे.

"(ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदीनुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास अपात्र नाही."

४. दि. १३ ऑगस्ट, २०१८ अन्वये विहित केलेल्या शपथपत्रातील मुद्दा क्र. १६.५ खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे.

"१६.५ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास अपात्र नाही."

वरील सुधारणा अंतर्भूत करुन नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचा सुधारीत नमुना सोबत जोडल्यानुसार राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१२.१२.२०१९

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत - १. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
४. संगणकीकरण शाखा - संगणक प्रणालीमधील नमुन्यात योग्य त्या दुरुस्त्या करण्याकरीता
५. निवड नस्ती

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. २४/का-५, दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ सोबतचे सहपत्र)

अनुसूची-१

नामनिर्देशनपत्र (महानगरपालिका)

(प्रस्तावक व अनुमोदनकर्ता आणि उमेदवार अथवा संबंधित अधिकारी यांनी भरावयाचे)

भाग एक

आम्ही, याद्वारे ;

महानगरपालिका : _____

प्रभाग क्रमांक : _____ जागा क्रमांक : _____

प्रभागाचे नाव (असल्यास) _____ मधून निवडणुकीकरिता _____

_____ यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहोत.

(१) उमेदवाराचे नाव : _____

(२) वडिलांचे/पतीचे नाव : _____

(३) लिंग : पुरुष/स्त्री/इतर

(४) जन्मतारीख व वय : _____ / _____ / _____ , _____ वर्षे _____ महिने

(५) व्यवसाय/धंदा : _____

(६) संपूर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता) : _____

_____

_____

(७) उमेदवाराचा मतदार यादीतील तपशील—

(अ) नाव : _____

(ब) प्रभाग क्रमांक : _____

(क) अनुक्रमांक : _____

(८) उमेदवाराचा प्रवर्ग : (राखीव जागेची निवडणूक असल्यास)

अनुसूचित जाती	☐	प्रवर्ग _____
अनुसूचित जमाती	☐	प्रवर्ग _____
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग	☐	प्रवर्ग _____

(९) महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय? : _____

(१०) मतदार यादीमधील प्रस्तावकाचा तपशील—

(अ) प्रस्तावकाचे नाव : _____

(ब) प्रभाग क्रमांक : _____

(क) अनुक्रमांक : _____

दिनांक :

(प्रस्तावकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

११) मतदार यादीमधील अनुमोदकाचा तपशील -

अ) अनुमोदकाचे नाव : ----------

ब) प्रभाग क्रमांक : ----------

क) अनुक्रमांक: ----------

दिनांक : (अनुमोदकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

मी, याद्वारे सूचित करतो की, निवडून आल्यास महानगरपालिका सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र

मी, याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, मी असेही घोषित करतो की,

(अ) माझ्या वयाची -------वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदीनुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही

(क) मी महानगरपालिकेचा ठेकेदार नाही.

(ड) मी महानगरपालिकेस नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

दिनांक :

उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

नाव----------

प्रभाग क्र.---------- जागा क्र.---------- व प्रभागाचे नाव (असल्यास)----------

कोणताही रकाना रिक्त ठेवू नये. लागू नसल्यास अथवा निरंक असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

भाग दोन

(निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र)

मी, याद्वारे आणखी असे घोषित करतो की,—

(अ) मी, या निवडणुकीमध्ये ———————————— *पक्ष (राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे नोंदणी झालेल्या पक्षाचे नाव) यांच्यातर्फे उभा आहे/मी अपक्ष उमेदवार म्हणून उभा आहे. (लागू नसेल ते खोडावे.)

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :—

(१)

(२)

(३)

दिनांक :

उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

भाग तीन

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक _____

हे नामनिर्देशनपत्र, *उमेदवाराने/उमेदवाराच्या प्रस्तावकाने/अनुमोदनकर्त्याने ..... रोजी (दिनांक) ..... वाजता (वेळ) माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द केले.

दिनांक :

निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

नामनिर्देशनपत्र स्वीकारल्याबद्दल किंवा नाकारल्याबद्दल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय

मी, ... अधिनियमाच्या कलम ..... नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :—

.....

.....

दिनांक :

निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

* लागू नसेल ते खोडावे.

भाग चार

(नामनिर्देशनपत्र व छाननीची नोटीस याची पोहोच)

(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीकडे द्यावयाची)

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ..... महानगरपालिका प्रभाग क्रमांक ..... व जागा क्रमांक ..... प्रभागाचे नाव (असल्यास) मधील निवडणूक उमेदवार ..... यांचे नामनिर्देशनपत्र ..... (दिनांक) रोजी ..... (वेळ) वाजता * उमेदवाराकडून/उमेदवाराच्या प्रस्तावकाकडून/अनुमोदनकर्त्याकडून माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आले आहे.

सर्व नामनिर्देशनपत्रांची ..... (ठिकाण) येथे ..... (दिनांक) रोजी ..... (वेळ) वाजता छाननी करण्यात येईल.

दिनांक :

निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

* लागू नसेल ते खोडावे.

अनुसूची -१

महानगरपालिका

नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने दयावयाचे शपथपत्र

मी ----------वय-------

खालील प्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की,

(१) वैयक्तीक माहिती-

(अ) नाव :----------

(ब) लिंग :----------

(क) वडिलांचे/पतीचे नाव :----------

(ड) जन्मतारीख :----------

(इ) वय :----------

(फ) व्यवसाय/धंदा :----------

(ग) संपुर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता) :----------

(ह) दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :----------

(य) ई-मेल आयडी :----------

(२) निवडणूक लढवू इच्छितो त्या जागेचा तपशील-

महानगरपालिकेचे नाव :----------

प्रभाग क्रमांक :----------

प्रभागाचे नाव :----------

(३) जातीबाबतचा तपशील-

(अ) जातीचा प्रवर्ग :----------

(अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती

नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग)

(ब) जात :----------

(क) जात प्रमाणपत्र देणारा अधिकारी : क्र.----------दिनांक ----------

(ड) जात वैधता प्रमाणपत्र देणारा अधिकारी क्र.----------दिनांक ----------

(इ) जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर उमेदवाराने

जात वैधता प्रमाणपत्रासाठी पडताळणी समितीकडे

सादर केलेल्या अर्जाच्या पोचपावतीचा तपशील :----------

(४) मतदार यादीतील माझा तपशील-

(अ) नाव :----------

(ब) प्रभाग क्रमांक :----------

(क) अनुक्रमांक :----------

(५) माझी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे

अ. क्र.	शिक्षण	विद्यालय/विश्वविद्यालयाचे नाव	उतीर्ण होण्याचे वर्ष
कमाल शैक्षणिक अर्हता नमूद करावी. धारण केलेल्या पदवी/पदविका/प्रमाणपत्र याचे संपूर्ण नाव नमूद करावे.			

(६) अपत्यांची संख्या-

(अ) आज रोजी असलेल्या अपत्यांची संख्या :----------

(ब) त्यापैकी दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या व त्यांच्या जन्मतारखा. :----------

(७) गुन्हेगारी पार्श्वभूमी-

(अ) मला दोषसिध्दीनंतर दोन वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरीता कैद होऊ शकेल अशा अपराधांचा माझ्यावर आरोप आहे/नाही त्याबाबत आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(जिथे दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांचा तपशील येथे दयावा.)

अ. क्र.	ज्या न्यायालयाने दखल घेतली आहे त्या न्यायालयाचे नाव	दावा क्रमांक	न्यायालयाने दखल घेतलेल्या आदेशाचा दिनांक	कायदयाचे कलम व दखल घेण्यात आलेल्या गुन्हयांचा तपशील

(ब) मला खालील अपराधांसाठी दोषी ठरविण्यात आले आहे. (ज्या अपराधांच्या अपराध सिध्दीमुळे आणि शिक्षेमुळे मला निवडणूक लढविण्याकरिता अपात्र ठरवता येईल अशा अपराधांव्यतिरीक्त) आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	न्यायालयाचे नाव	दावा क्रमांक	न्यायालयीन आदेशाचा दिनांक	कायद्याचे कलम व दोषी ठरविण्यात आलेल्या गुन्हयाचा तपशील	दखल घेतलेल्या उपरोक्त आदेशाच्या विरोधात केलेल्या अपील (ले)/ पुनरिक्षण(णे) इत्यादीबाबतचा तपशील

(८) व्यवसाय किंवा कामधंदा याचा तपशील (लागू असेल तिथे ✓ अशी खुण करावी)

अ. क्र.	तपशिल	१) शेती	२) नोकरी	३) व्यापार	४) उदयोग	५) इतर
१	स्वत:					
२	पती/पत्नी					
३	अवलंबित १					
४	अवलंबित २					

(९) वार्षिक उत्पन्नाबाबतचा तपशील -

अ)

अ. क्र.	तपशील	पॅन क्रमांक	आयकर रिटर्न भरणा केलेले मागील वर्ष	रकाना ४ मधील आयकर रिटर्न मध्ये दर्शविलेले एकूण वार्षिक उत्पन्न
१	२	३	४	५
१	स्वत:			
२	पती/पत्नी			
३	अवलंबित १			
४	अवलंबित २			

(ब) उमेदवाराचे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाबाबतचा तपशील (रुपये हजारात)

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, इमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

(क) उमेदवाराचे पती/पत्नीचे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाबाबतचा तपशील

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, ईमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

ड) उमेदवाराचे अवलंबित १ चे मागील ३ वर्षाचे उत्पनन्नाबाबतचा तपशील

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, ईमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

(इ) उमेदवाराचे अवलंबित क्र २ चे मागील ३ वर्षाचे उत्पन्नाबाबतचा तपशील

अ. क्र.	तपशील	वर्ष १ ले	वर्ष २ रे	वर्ष ३ रे
१	शेती			
२	नोकरी			
३	व्यापार/व्यवसाय			
४	भांडवली नफा			
५	अकृषिक जमिनी, व्यापारी वा निवासी गाळे, ईमारती इत्यादी पासून उत्पन्न			
६	बक्षिस/देणगी इत्यादी			
७	इतर उत्पन्न			
८	एकूण उत्पन्न			
९	रिटर्न फाईल केलेचा दिनांक व पावती क्रमांक			

(१०) मत्ता व दायित्व याचा तपशील -

१. जंगम मालमत्तेचा तपशील

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

अ. क्र.	वर्णन	स्वत: नाव	पती /पत्नीचे नाव	अवलंबित १ चे नाव	अवलंबित २ चे नाव	अवलंबित ३ चे नाव
१	रोख रक्कम					
२	बँक वित्तीय संस्था व बँकेव्यतिरीक्त वित्तीय कंपन्या, सहकारी संस्था यातील ठेवी (बचतखाते, मुदत ठेवी, व इतर सर्व प्रकारच्या ठेवींचा तपशील)					
३	कंपन्या/म्युच्युअल फंडस आणि इतर संस्था यातील बंधपत्र, कर्जरोखे, भाग (शेअर्स) युनिट्स इ. गुंतवणुकीचा तपशील. (बंधपत्रे/कर्जरोखे, भाग यांचे मुल्यसुचीतील कंपन्याच्या बाबतीत शेअर बाजारामधील सध्याच्या बाजारातील मुल्यानुसार व					

	सुचिबाहय कंपन्याच्या बाबतीत पुस्तकी मुल्यानुसार देण्यात यावे)					
४	इतर वित्तीय दस्तऐवज, राष्ट्रीय बचत पत्रातील गुंतवणुक, पोस्ट ऑफिस मधील ठेवी, एल.आय.सी व इतर कंपन्याच्या विमा पॉलिसी					
५	जेसीबी, पोकलॅन, रोलर, हार्वेस्टर इत्यादी यंत्र सामुग्रीची रक्कम					
६	मोटार वाहने/विमाने/जहाजे/बोटी इत्यादी (बनावटीचा तपशील इत्यादी) नोंदणी क्रमांक खरेदी वर्ष व रक्कम					
७	जडजवाहीरे, मौल्यवान वस्तु (वजन व मुल्य यांचा तपशिल)					
८	फर्म, कंपनी, ट्रस्ट आणि इतर व्यक्ती यांना दिलेली वैयक्तीक कर्जे, अग्रीम रक्कम तसेच ऋणकोकडून येणे असलेली इतर रक्कम					
९	दाव्यांचे/ व्याजांचे मुल्य यासारखी इतर मालमत्ता					
१०	भागिदारी फर्म, कंपनी वा इतर संस्था यातील गुंतवणूक					
११	कोणत्याही जंगम मालमत्तेमधील हक्क (उदा. संयुक्त मालकी), हातउसने किंवा उधारीने दिलेली रक्कम					
१२	राजकीय पक्ष/आघाडी, युती, मोर्चा व तत्सम कडून प्राप्त रक्कम/निधी/मुल्यवान मदत					
१३	इतर सर्व प्रकारची जंगम मालमत्ता					

२. स्थावर मालमत्तेचा तपशील

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

अ. क्र.	वर्णन	स्वतः नाव	पती/पत्नीचे नाव	अवलंबित १ चे नाव	अवलंबित २ चे नाव	अवलंबित ३ चे नाव
१	अ) कृषी जमीन					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					
	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय (होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत (जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकुन, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्तेचे मूल्य					
२	ब) अकृषिक जमीन					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक/प्लॉट क्र./मालमत्ता क्र.					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					

	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय (होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत (जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकुन, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्तेचे मूल्य					
३	क) इमारती (व्यापारी व निवासी)					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					
	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय (होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत(जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकून, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी					

	एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्तेचे मूल्य					
४	(ड) घर/सदनिका इत्यादी					
	स्थान (ने)					
	-सर्वे क्रमांक					
	क्षेत्र (एकूण मोजमाप)					
	वारसा हक्काने वा भेट/ बक्षीसपत्राने (gift) प्राप्त मालमत्ता आहे काय होय/नाही)					
	स्वयंअर्जित मालमत्ता असल्यास खरेदीची तारीख					
	-खरेदीची किंमत					
	मालमत्ता खरेदी करण्यासाठी च्या रक्कमेचा स्त्रोत (जसे स्वअर्जित, कर्ज, मालमत्ता विकून, हातउसने, स्त्रीधन विक्री, भागिदारीतून इतर पैकी एक वा अनेक नमूद करावीत)					
	जमिनीवरील बांधकाम व विकासासाठीची केलेली गुंतवणूक रक्कम					
	सध्याचे बाजारभावानुसार मालमत्ताचे मुल्य					
५	इतर (संपत्तीमधील हक्क यासारखे)					
६	१ ते ५ मधील सदय बाजारमुल्याची एकूण बेरीज					

३. मी देय असलेल्या सार्वजनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय/निमशासकीय संस्थाकडील दायित्वे/थकीत रकमा यांचा तपशील (प्रत्येक बाबींचा तपशील स्वतंत्रपणे दयावा.)

अ. क्र.	वर्णन	स्वत: नाव	पती/पत्नीचे नाव	अवलंबित १ चे नाव	अवलंबित २ चे नाव	अवलंबित ३ चे नाव
अ	१. बँकेकडून घेतलेले कर्ज किंवा बँकेला असलेली देणी					
	२. वित्तीय संस्थाकडून घेतलेले कर्ज किंवा वित्तीय संस्थाला असलेली देणी					
	३. बँक/वित्तीय संस्था यांचे नाव					
	४. शिल्लक रक्कम					
	५. कर्जाचा प्रकार (तारणी/बिनतारणी)					
ब	१. वरील अ व्यतिरिक्त इतर व्यक्तीकडून/संस्थेकडून घेतलेले कर्ज/उधार/देणी					
	२. कर्ज/उधार/देणी देणाऱ्याचे नाव व पत्ता					
	३. कर्ज/उधार/देणी देणे रक्कम					
	४. कर्जाचा प्रकार (तारणी/बिगरतारणी)					
क	शासकीय /निमशासकीय देणी					
	१. गृह निर्माण विभागाकडील देणी					
	२. पाणीपुरवठा विभागाकडील देणी					
	३. विद्युत पुरवठा विभागाकडील देणी					
	४. दूरध्वनी /दुरसंचार यांचेकडील देणी					
	५. सार्वजनिक वाहतूक विभागाकडील देणी, (विमान/हेलिकॉप्टर सह)					
	६. इतर सर्व शासकीय विभागाकडील देणी, निमशासकीय विभागाकडील देणी, स्थानिक स्वराज्य संस्था, यांची देणी					
	७. आयकर					
	८. संपत्तीकर					

	९. सेवाकर					
	१०. महानगरपालिका/मालमत्ताकर					
	११. विक्रीकर					
	१२. वस्तु व सेवा कर					
	१३. इतर सर्व देणी					
	१४. वरील सर्व शासकीय/ निमशासकीय देण्याची रक्कम एकूण					
	१५. शासकीय देणेसंदर्भातील विवाद प्रलंबित असल्यास त्याचा तपशील					

११. (अ) उमेदवाराचा स्वतः चा कराराचा तपशील (मागील ३ वर्षांचा)

अ. क्र.	कराराचे स्वरुप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
३	स्थानिक स्वराज्य संस्था						
४	सार्वजनिक उपक्रम						
५	सहकारी संस्था						

(ब) उमेदवाराचे पती/पत्नी चा कराराचा तपशील (मागील ३ वर्षांचा)

अ. क्र.	कराराचे स्वरुप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
३	स्थानिक स्वराज्य संस्था						
४	सार्वजनिक उपक्रम						
५	सहकारी संस्था						

(क) उमेदवाराचे अवलंबित १ चा कराराचा तपशील (मागील ३ वर्षाचा)

अ. क्र.	कराराचे स्वरूप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
३	स्थानिक स्वराज्य संस्था						
४	सार्वजनिक उपक्रम						
५	सहकारी संस्था						

(ड) उमेदवाराचे अवलंबित २ चा कराराचा तपशील (मागील ३ वर्षाचा)

अ. क्र.	कराराचे स्वरूप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
३	स्थानिक स्वराज्य संस्था						
४	सार्वजनिक उपक्रम						
५	सहकारी संस्था						

(इ) उमेदवाराचे स्वतः अथवा त्याची पत्नी/पती/ अवलंबित १/अवलंबित २ हे ज्या कंपनीत /फर्म/भागीदारी संस्थामध्ये भागीदार / डायरेक्टर / असतील त्या संस्थेचा मागील तीन वर्षांच्या कराराबाबत तपशील

१. कंपनीचे/फर्म/भागीदार संस्थेचे नाव व पत्ता ----------

२. उमदेवार /पती/पत्नी/ अवलंबित १/अवलंबित २

यापैकी कोणी भागीदार आहे काय ? ----------

अ. क्र.	कराराचे स्वरूप	कराराचे विषयाचा तपशील	कराराचा कालावधी		कराराची रक्कम	आज रोजी कराराची सद्य:स्थिती पुर्णत्वास/अपूर्ण	कराराबाबत विवादाचा तपशील
			पासून	पर्यंत			
१	शासकीय						
२	निम्न शासकीय						
३	स्थानिक स्वराज्य संस्था						
४	सार्वजनिक उपक्रम						
५	सहकारी संस्था						

१२. (अ) परकीय गुंतवणुकीचा तपशील (जंगम) (उमदेवार, पती/पत्नी, अवलंबित १, अवलंबित २ यांचा सर्वांचा तपशील दयावा.)

असलेली कंपनी/संस्था/भागीदारी	देश	कंपनी/बँकेचे नाव	पत्ता	परदेशातील तात्पुरत्या रहिवासाचा पत्ता	दिनांक	गुंतवणुकीची रक्कम

(ब) परकीय गुंतवणुकीचा तपशील (स्थावर) (उमदेवार, पती/पत्नी, अवलंबित १, अवलंबित २ यांचा सर्वांचा तपशील दयावा.)

देश	स्थावर मिळकतीचे वर्णन	पत्ता	परदेशातील तात्पुरत्या रहिवासाचा पत्ता	दिनांक	रक्कम

१३. उमेदवाराचे विरूध्द सुरू असलेले वसुलीबाबत दिवाणी दाव्याचा तपशील

१. न्यायालय ----------

२. दाव्याचा क्रमांक ----------

३. दाव्याची रक्कम ----------

४. दाव्याची सद्य:स्थिती ----------

१४. वरील शपथपत्रामध्ये सादर केलेल्या तपशीलाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

(उमेदवारांनी दाखल केलेल्या उपरोक्त शपथपत्रातील माहितीचा गोषवारा)

अ.क्र.	तपशील	माहिती
१	वय	
२	शिक्षण	
३	व्यवसाय	
४	अपत्यांची संख्या	
५	दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांची संख्या	
६	ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे अशा प्रकरणांची संख्या	
७	उमेदवाराचा पॅन क्रमांक	
८	कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न	
९	कुटुंबाच्या जंगम मालमत्तेचा तपशील	
१०	कुटुंबाच्या स्थावर मालमत्तेचा तपशील	
११	एकूण मालमत्ता (अ.क्र.९ +१०)	
१२	मी, देय असलेल्या सार्वजनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय/निमशासकीय संस्थांकडील दायित्वे / थकीत रकमा यांचा तपशील	

१५. (अ) मागील निवडणुकीमध्ये सादर केलेल्या शपथपत्रातील माझी स्थावर व जंगम मालमत्ता तसेच दायित्वे / थकीत रकमा यांच्या तपशीलाचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

(उमेदवाराने यापूर्वी मागील निवडणूक लढविली असल्यास, त्या निवडणुकीच्यावेळी सादर केलेल्या माहितीचा गोषवारा)

अ.क्र.	मागील लढविलेल्या निवडणुकीचे नाव	निवडणुकीचे वर्ष	एकूण जाहीर केलेली स्थावर व जंगम मालमत्तेचे मूल्य	दायित्वे / थकीत रकमा यांच्या तपशीलाचा गोषवारा
१	२	३	४	५

(ब) मतदारसंघ विकास योजना

अ.क्र.	प्रश्न उत्तर
१	जर मी निवडून आल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या विकासासाठी मी खालीलप्रमाणे उपाययोजना करीन. (कमीत कमी १०० शब्द वजास्तीत जास्त ५०० शब्द)

१६. मी शपथेवर सांगतो/सांगते की, -

१. वरील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातील कोणताही भाग खोटा नसून त्यामध्ये कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही,

२. दिनांक १२ सप्टेंबर २००१ नंतर माझ्या एकूण मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

३(अ). निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि मी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य राहण्यास अनर्ह/अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

३(ब). निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र सादर करीन अशी हमी देत आहे.

४. निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये निवडणूक खर्चाचा हिशोब विहित पद्धतीने सादर न केल्यास मी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य राहण्यास अनर्ह/अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे

५. यथास्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०/मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी महानगरपालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही.

६. सदर निवडणूक, मी मुक्त, निर्भय व पारदर्शकरित्या लढविन तसेच सदर निवडणुकीमध्ये, मी किंवा माझ्यावतीने कोणीही व्यक्ती, कोणत्याही प्रकारच्या भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणार नाही आणि जर मी किंवा माझ्यावतीने कोणीही भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला असल्याचे आढळून आल्यास मी कारवाईस पात्र राहीन.

स्थळ:-

दिनांक:- (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

पडताळणी

मी वर नमूद केलेला अभिसाक्षी, तपासणी करून घोषित करतो की, या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातला कोणताही भाग खोटा नसून, त्यापासून कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

-----येथे दिनांक-----माहे-----२०-- रोजी तपासले.

स्थळ:- अभिसाक्षी,

दिनांक :- माझ्यापुढे तपासले,

(तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम शिक्का).